(**<u>इंग्रेजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद</u>**)

[२०२३] ३ एस. सी. आर  ११००

महाराष्ट्र आदीवासी ठाकुर जमात स्वरक्षण समिती

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर

(दिवाणी अपील क्रमांक २५०२/२०२२)

२४ मार्च, २०२३

**[न्यायमूर्ती संजय किशन कौल, न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि न्यायमूर्ती  मनोज मिश्रा]**

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग  (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० – कलम २,३,४,५,६,९ - महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३ – नियम १०,१२ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ -सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेल्या जाती प्रमाणपत्राच्या आधारे जातीच्या दाव्यावर निर्णय घेताना  आप्तभाव चाचणीला सर्वोच्च महत्त्व दिले पाहिजे काय -दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आप्तभाव चाचणी ही जातीचा दावा ठरवण्यासाठी लिटमस चाचणी आहे का हा प्रश्न आहे-असे मानले : चौकशी केल्यानंतर जेव्हा पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांबद्दल समाधानी नसेल, तेव्हाच हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवले जाऊ शकते -हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठविताना, पडताळणी समितीने अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांबद्दल समाधानी नाही या निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी संक्षिप्त कारणे नोंदविली पाहिजेत - चौकशीसाठी प्रकरण दक्षता विभागाकडे पाठविल्यानंतरच, आप्तभाव चाचणी घेण्याची संधी निर्माण होईल -जेव्हा दक्षता विभागाद्वारे आप्तभाव चाचणी घेतली जाते, तेव्हा जातीच्या वैधतेच्या दाव्याचा निर्णय घेण्यासाठी पडताळणी समितीला चाचणीचा निकाल

आणि अभिलेखातील इतर सर्व पुरावा मूल्य असलेल्या दस्तऐवजांचा विचार करावा लागेल- थोडक्यात, आप्तभाव चाचणी ही जातीचा दावा ठरवण्यासाठी लिटमस चाचणी नाही आणि प्रत्येक प्रकरणात जाती किंवा जमातीचा दावा अचूक ठरवण्याच्या प्रक्रियेत हा अत्यावश्यक घटक नाही.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००- महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ - जाती पडताळणी समिती अर्ध-न्यायिक कार्य करते काय- असे मानले: २००० च्या अधिनियमांतर्गत पडताळणी समितीला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे विविध अधिकार सोपवण्यात आले आहेत- कोणत्याही साक्षीदाराच्या उपस्थितीची अंमलबजावणी करण्यासाठी, शपथपत्रावर पुरावा प्राप्त करण्याचा, साक्षीदार किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी राजादेश काढण्याचा अधिकार समाविष्ट आहे. २००० च्या अधिनियमाच्या आणि अनुसूचित जाती आणि जमाती या दोन्ही नियमांच्या योजनांमध्ये, पडताळणी समितीला अर्जदाराच्या जातीच्या दाव्याची चौकशी करण्याची, आवश्यक असल्यास, शपथेवर अर्जदाराची तपासणी घेतल्यानंतर, साक्षीदारांचे पुरावे नोंदवण्याची आणि कागदपत्रे व अभिलेख मागवण्याची तरतूद आहे. जाती वैधता प्रमाणपत्रे जारी करण्याची विनंती मंजूर करण्याची आणि नाकारण्याची कारणे पडताळणी समितीने नोंदविणे अपेक्षित आहे- अशा प्रकारे, पडताळणी समितीकडे अर्ध-न्यायिक प्राधिकाऱ्याचे सर्व अधिकार आहेत.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० -महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३- महाराष्ट्र

अनुसूचित जाती, बिना अधिसूचित जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ - 'विजकुमार -विरुद्ध- महाराष्ट्र राज्य आणि इतर आणि आनंद विरुद्ध-जमातीच्या दाव्यांची छाननी आणि पडताळणी समिती आणि इतर' च्या प्रकरणांमध्ये आप्तभाव चाचणी घेण्याबाबत मतभेद व्यक्त केले गेले- असे मानले : २००० च्या अधिनियमाचा आणि नियमांचा विचार केला गेला नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रत्येक बाबतीत पडताळणी समितीने हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवून आप्तभाव चाचणीचा अवलंब करणे आवश्यक आहे या प्रस्तावासाठी विजकुमारच्या प्रकरणामध्ये घेतलेला निर्णय हा एक बाध्यकारी उदाहरण नाही - आनंदच्या प्रकरणाप्रमाणे सदर न्यायालय समान कारणे नोंदवते की, आप्तभाव चाचणी नेहमीच अनिवार्य आणि / किंवा निर्णायक नसेल.

**संदर्भाला उत्तर देताना, न्यायालयाने असे मानले :-**

**१. २००० च्या अधिनियमाने जातीच्या दाव्यांच्या पडताळणीसाठी द्विस्तरीय प्रणाली सुरू केली आहे. कलम ४ च्या उपकलम (२) मध्ये वापरलेली स्पष्ट भाषा लक्षात घेता, सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले जाती प्रमाणपत्र अर्जदाराच्या जातीच्या दाव्याला निर्णायकपणे सिद्ध करत नाही. सक्षम प्राधिकाऱ्याने ज्या व्यक्तीला जातीचे प्रमाणपत्र दिले आहे, ती व्यक्ती आपला जातीचा दर्जा सिद्ध झाल्याचा दावा करू शकत नाही. सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले जाती प्रमाणपत्र २००० च्या अधिनियमामध्ये पूर्वकल्पित केल्याप्रमाणे तपशीलवार चौकशीनंतर आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांची पडताळणी समितीने चौकशी केल्यानंतर आणि प्रमाणपत्र प्रमाणित झाल्यानंतरच त्यात नमूद केलेल्या जातीचा निर्णायक पुरावा बनते. त्यामुळे जेव्हा कलम ३ अंतर्गत जाती प्रमाणपत्र देण्यासाठी केलेल्या अर्जाचा सक्षम प्राधिकाऱ्याकडून विचार केला जातो, तेव्हा अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांची अतिशय तपशीलवार छाननी करण्याचा विचार केला जात नाही. जातीच्या दाव्याच्या खरेपणाचे सकृतदर्शनी समाधान आणि अशा समाधानाच्या आधारे विचार केला जातो की कलम ४ च्या उपकलम (१) मध्ये पूर्वकल्पित केल्याप्रमाणे जाती प्रमाणपत्र जारी केले जाऊ शकते. त्यामुळे, कलम ४ च्या उपकलम (१) प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्टपूर्वक अर्ज नाकारण्याची कारणे नोंदवणे आवश्यक आहे, परंतु जाती प्रमाणपत्र**

देताना कारणे देण्याची अशी कोणतीही आवश्यकता समाविष्ट केलेली नाही. तथापि, जाती पडताळणी समितीने जाती प्रमाणपत्र प्रमाणित करण्यासाठी आणि प्रमाणित न करण्यासाठी दोन्ही कारणे नोंदवणे अपेक्षित आहे. अनुसूचित जमातीच्या नियमावलीतील नियम ४ च्या उप-नियम (६) मध्ये अशी तरतूद आहे की सक्षम प्राधिकारी हे अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची मूळ कागदपत्रांशी पडताळणी करतील आणि अर्जदाराने सादर केलेली माहिती, कागदपत्रे आणि पुराव्याच्या खरेपणाबद्दल समाधानी असल्यास, सदर अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र जारी करतील. या नियमांतर्गत निश्चित केलेली कालमर्यादा देखील एक सूचक आहे, जी सुचविते की सक्षम प्राधिकाऱ्याने एक संक्षिप्त चौकशी करावयाची आवश्यकता आहे आणि सविस्तर चौकशी करण्याची गरज नाही. १५ दिवसांच्या आत जाती प्रमाणपत्र देण्याचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याने पडताळणी समितीच्या बरोबरीने सविस्तर चौकशी करावयाचे असल्यास पूर्ण होऊ शकत नाही. सदर कायद्यामध्ये पडताळणी समितीद्वारे जातीच्या दाव्याची अतिशय तपशीलवार छाननी करण्याचे योजले आहे. जर सक्षम प्राधिकारी आणि जात पडताळणी समिती या दोघांनाही जातीच्या दाव्यांची समान प्रमाणात छाननी आणि तपशीलवार चौकशी करावयाची असेल तर द्विस्तरीय छाननीचा उद्देशच निष्फळ होईल. कलम ८ मध्ये अशी तरतूद आहे की सक्षम प्राधिकारी आणि पडताळणी समितीसमोर जातीचा दावा सिद्ध करण्याचा भार अर्जदारावर आहे. सक्षम प्राधिकाऱ्यासमोर भारापासून मुक्त होण्यासाठी, जर अर्जदाराने त्याचा जातीचा दावा खरा आहे हे दाखवण्यासाठी सकृतदर्शनी दस्तऐवज सादर केले तर ते पुरेसे आहे. पडताळणी समितीसमोर आपल्या जातीची स्थिती सिद्ध करण्यासाठी कलम ८ द्वारे अर्जदारावर टाकलेला भार हा सक्षम प्राधिकाऱ्यासमोर भारापासून मुक्त होण्यापेक्षा खूप जास्त आहे. [परिच्छेद १४, १५] [१११८ -एफ-एच; १११९ -ए-जी]

२. अनुसूचित जमातीच्या नियमावलीतील नियम १२ च्या उप-नियम (२) मध्ये अशी स्पष्ट तरतूद आहे की, पडताळणी समिती जर अर्जदाराने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्यांशी समाधानी नसेल, तरच ती शाळा, घर आणि इतर बाबतीत चौकशी करण्यासाठी अर्ज दक्षता विभागाकडे पाठविण्यात येईल. त्यामुळे प्रत्येक बाबतीत, नित्याची बाब म्हणून, पडताळणी समिती चौकशी करण्यासाठी अर्ज यंत्रवतपणे दक्षता विभागाकडे पाठवू शकत नाही. जेव्हा नियम १२ चा उप-नियम (२) मध्ये असे योजलेले आहे की अर्जदाराने सादर

केलेल्या दस्तऐवजांवर पडताळणी समिती समाधानी नसेल तरच प्रकरण दक्षता विभागाकडे पाठविण्यात यावे, तेव्हा पडताळणी समितीने, अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवर आपले समाधान का झाले नाही याची संक्षिप्त कारणे नोंदवून आदेश पारित करणे आवश्यक आहे. प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवण्यापूर्वी, अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवर विवेकबुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे आणि म्हणूनच, विवेकबुद्धीचा वापर, पडताळणी समितीच्या आदेशपत्रकांमध्ये प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. [परिच्छेद १९] [११२३-बी-डी]

३. अर्जदाराने विसंबून ठेवलेले जातवैधता प्रमाणपत्र कायदेशीर चौकशी केल्यानंतर जारी करण्यात आले आहे, याबद्दल पडताळणी समिती समाधानी असू शकते. परंतु जर पडताळणी समितीचे असे मत असेल की, अर्जदाराने अनुसूचित जमातीच्या नियमावलीतील नियम १२ च्या उप-नियम (२) अन्वये हे स्पष्टपणे सिद्ध केले नाही की ज्या व्यक्तीला अभिलेखावर सादर केलेले जाती वैधतेचे प्रमाणपत्र दिले गेले आहे ती व्यक्ती त्याचा रक्ताचा नातेवाईक आहे, तर जात पडताळणी समितीला हे प्रकरण दक्षता विभागामार्फत चौकशीसाठी पाठवावे लागेल. अशा प्रकरणात, ज्या व्यक्तीच्या बाजूने जातीच्या वैधतेचे प्रमाणपत्र जारी केले गेले आहे, त्या व्यक्तीशी अर्जदाराने दावा केलेल्या संबंधापुरती मर्यादित चौकशी करण्याचे निर्देश पडताळणी समितीकडून दक्षता विभागाला दिले जाऊ शकतात. दक्षता विभागाच्या अहवालाच्या आधारे, ज्या व्यक्तीच्या बाजूने जातीच्या वैधतेचे प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे ती व्यक्ती अर्जदाराचा रक्ताचा नातेवाईक आहे आणि वैधतेचे प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी विधिसंमत चौकशी करण्यात आली आहे असे पडताळणी समितीचे समाधान झाल्यास, अर्जदाराने आप्तभाव चाचणी पूर्ण केली नसली तरीही पडताळणी समितीला वैधतेचे प्रमाणपत्र जारी करावे लागेल. [परिच्छेद २३] [११२५ -सी-जी]

<u>आप्तभाव चाचणी</u>

४. दक्षता विभाग, आप्तभाव चाचणी आयोजित करताना, त्या विशिष्ट अनुसूचित जमातीच्या संदर्भात समाजातील देवता, चालीरीती, विधी, विवाह पद्धती, मृत्यू समारंभ इत्यादींबद्दल अर्जदाराच्या ज्ञानाची पडताळणी करते. त्याच्या स्वभावानुसार, अशी

आप्तभाव चाचणी कधीही निर्णायक असू शकत नाही. जर अर्जदार त्याच्या कुटुंबासह अनेक दशके मोठ्या शहरी भागात राहिला असेल किंवा त्याचे कुटुंब अशा शहरी भागात अनेक दशके राहिले असेल तर अर्जदाराला उपरोक्त तथ्यांची माहिती नसेल. हे खरे आहे की दक्षता विभाग अर्जदाराच्या पालकांशी सुद्धा प्रश्न करू शकतो. परंतु एखाद्या प्रकरणात, अनेक वर्षांपासून मोठ्या शहरी भागात राहत असल्यामुळे पालकांनाही त्याची माहिती नसते. दुसरीकडे, एखादी व्यक्ती विशिष्ट जमातीची नसली, तरी त्याला उपरोक्त पैलूंबद्दल चांगले ज्ञान असू शकते. म्हणून, विद्वान वरिष्ठ अधिवक्त्यांनी योग्यपणे सादर केले की, आप्तभाव चाचणी लिटमस चाचणी म्हणून लागू केली जाऊ शकत नाही. सदर न्यायालयाने येथे अशी नोंद घ्यावी की, आप्तभाव चाचणी घेण्याचा प्रश्न केवळ अशा प्रकरणांमध्ये उद्भवतो जेथे पडताळणी समिती, अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांबद्दल समाधानी नसते. [परिच्छेद २५] [११२६-ई-जी]

<u>जाती पडताळणी समिती ही अर्ध न्यायिक कामगिरी बजावते काय ?</u>

५. २००० च्या अधिनियमाचे तसेच त्याखाली तयार केलेल्या अनुसूचित जमाती आणि जातीच्या नियमांचे संयुक्त वाचन केल्यावर, पडताळणी समिती केवळ प्रशासकीय कामगिरी पार पाडते असा निष्कर्ष काढणे अशक्य आहे. २००० च्या अधिनियमांतर्गत पडताळणी समितीला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे विविध अधिकार सोपवण्यात आले आहेत. या अधिकारांमध्ये, कोणत्याही साक्षीदाराच्या उपस्थितीची अंमलबजावणी करण्याचा, प्रतिज्ञापत्रांवर पुरावा प्राप्त करण्याचा, साक्षीदारांच्या किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी राजादेश काढण्याचा अधिकार समाविष्ट आहे. २००० च्या अधिनियमाच्या आणि अनुसूचित जाती आणि जमाती या दोन्ही नियमांच्या योजनांमध्ये, पडताळणी समितीला अर्जदाराच्या जातीच्या दाव्याची चौकशी करण्याची, आवश्यक असल्यास, शपथेवर अर्जदाराची तपासणी घेतल्यानंतर, साक्षीदारांचे पुरावे नोंदवण्याची आणि कागदपत्रे व अभिलेख मागवण्याची तरतूद आहे. जाती वैधता प्रमाणपत्रे जारी करण्याची विनंती मंजूर करण्याची आणि नाकारण्याची कारणे पडताळणी समितीने नोंदविणे अपेक्षित आहे. अशा प्रकारे, पडताळणी समितीकडे अर्ध-न्यायिक प्राधिकाऱ्याचे सर्व अधिकार आहेत. [परिच्छेद २८] [११२८-सी-एफ]

## <u>विजकुमार आणि आनंद यांच्या प्रकरणात दिलेले निर्णय</u>

६. २००० च्या अधिनियमाचा आणि नियमांचा विचार केला गेला नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रत्येक बाबतीत पडताळणी समितीने हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवून आप्तभाव चाचणीचा अवलंब करणे आवश्यक आहे या प्रस्तावासाठी *'विजकुमार'* ह्या प्रकरणामध्ये घेतलेला निर्णय हा एक बाध्यकारी उदाहरण नाही. [परिच्छेद २९] [११२९-सी-डी]

७. आनंदच्या प्रकरणातील निर्णयाचे परिच्छेद ४ आणि ५ हे विनिर्देशपूर्वक अनुसूचित जमातीच्या नियमावलीतील नियम ११ आणि १२(२) चे संदर्भ देतात. आप्तभाव चाचणी नेहमीच अनिवार्य आणि/किंवा निर्णायक नसेल, या निष्कर्षाप्रत पोहोचण्यासाठी, या न्यायालयाने यापूर्वी आनंदच्या प्रकरणात परिच्छेद २२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, समान कारणे नोंदवली. [परिच्छेद ३० ] [११२९-डी; ११३०-एफ-जी]

८. आता, *शिल्पा विष्णू ठाकूर* च्या प्रकरणातील आक्षेपित न्यायनिर्णयाकडे येत आहोत. पूर्ण खंडपीठ असे नमूद करत नाही की प्रत्येक प्रकरणात जेथे पडताळणी समिती अनुसूचित जमातीच्या दाव्याचा विचार करत आहे, तेथे दक्षता विभागाकडे संदर्भ देणे आवश्यक आहे. परिच्छेद ४० च्या खंड (२) (अ) मध्ये, पूर्ण खंडपीठाने नोंदवले आहे की पडताळणी समितीने पुराव्याच्या संपूर्ण भागाकडे लक्ष दिले पाहिजे, ज्यात अर्जदाराने आप्तभाव चाचणी पूर्ण केली आहे की नाही या प्रश्नाचा समावेश आहे. आधी म्हटल्याप्रमाणे, हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवल्यानंतरच आप्तभाव चाचणीचा आधार घेण्याचा प्रश्न उद्भवेल. खरे तर, परिच्छेद ४० च्या खंड (ब) मध्ये, पूर्ण खंडपीठाने असे म्हटले आहे की अर्जदाराकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नसला तरी त्याचा परिणाम प्रत्यक्षात जातीच्या दाव्याला अवैध ठरवण्यात येणार नाही. कारण असे आहे की अशा परिस्थितीत नियम १२ चा उप-नियम (२) लागू होईल आणि दक्षता विभागाला आप्तभाव चाचणीसह चौकशी करावी लागेल. अशा परिस्थितीतही, *आनंद* च्या प्रकरणात परिच्छेद २० च्या खंड (२) मध्ये मत व्यक्त केल्याप्रमाणे आप्तभाव चाचणी कोणत्याही प्रकारे निर्णायक ठरणार नाही. त्याच परिच्छेदाच्या खंड (क) मध्ये, उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने असेही म्हटले आहे की

**अभिलेखावरील पुराव्याच्या स्वरूपानुसार आप्तभाव चाचणीचे अर्जदार जरी अंशतः समाधान करित असले, तरी पडताळणी समितीला दावा वैध ठरविण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे, खंड (सी) सुद्धा या आधारावर पुढे जाऊन नमूद करतो की, आप्तभाव चाचणी निर्णायक नाही. [परिच्छेद ३४] [११३२ -डी-एच; ११३३-ए]**

**<u>निष्कर्ष</u>**

**९. अशा प्रकारे, निष्कर्ष काढण्यासाठी, या न्यायालयाने असे मानले आहे की :-**

**(अ) चौकशी केल्यानंतर जेव्हा पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांबद्दल समाधानी नसेल, तेव्हाच हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवले जाऊ शकते. हे प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवताना, पडताळणी समितीने अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांबद्दल समाधानी नसल्याच्या निष्कर्षावर येण्यासाठी संक्षिप्त कारणे नोंदवली पाहिजेत. चौकशीसाठी प्रकरण दक्षता विभागाकडे पाठवल्यानंतरच आप्तभाव चाचणी घेण्याची संधी निर्माण होईल.**

**(ब) नोंदवलेल्या कारणांमुळे, आप्तभाव चाचणी कोणत्याही प्रकारे निर्णायक असू शकत नाही. जेव्हा दक्षता विभागाद्वारे आप्तभाव चाचणी घेतली जाते, तेव्हा जातीच्या वैधतेच्या दाव्याचा निर्णय घेण्यासाठी पडताळणी समितीने, चाचणीच्या निकालासोबतच अभिलेखावरील संभाव्य मूल्य असलेले पुरावे व इतर सर्व दस्तऐवज विचारार्थ घेतले पाहिजे.**

**(क) थोडक्यात, आप्तभाव चाचणी ही जातीचा दावा ठरवण्यासाठी लिटमस चाचणी नाही आणि प्रत्येक प्रकरणात जाती किंवा जमातीच्या दाव्याचा खरेपणा निश्चित करण्याच्या प्रक्रियेचा आवश्यक भाग नाही. [परिच्छेद ३६] [११३३ -सी-जी]**

कुमारी माधुरी पाटील आणि इतर - विरुद्ध-अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास आणि इतर **(१९९४) ६ एस. सी. सी. २४१ : [१९९४ ] ३ पुरवणी एस. सी. आर. ५०;** आनंद-विरुद्ध-जमातीच्या दाव्यांची छाननी आणि पडताळणी समिती आणि इतर **(२०१२) १ एस. सी. सी. ११३ : [२०११] १५ एस. सी. आर. ३८६;** जिल्हाधिकारी, सातारा आणि इतर-विरुद्ध-मंगेश निवृत्ती काशीद **(२०१९) १० एस. सी. सी. १६६ : [२०१९] १५ एस. सी. आर. ६८५ - यावर विश्वास दर्शविला.**

पालघाट जिल्ला थंदन समुधाय संरक्षण समिथी आणि इतर -विरुद्ध-केरळ राज्य **(१९९४) १ एस. सी. सी. ३५९ : [१९९३] ३ पुरवणी एस. सी. आर. ८७२** ; महाराष्ट्र राज्य आणि इतर-विरुद्ध-रवी प्रकाश बाबूलालसिंग परमार आणि इतर **(२००७) १ एस. सी. सी. ८० : [२००६] ८ पुरवणी एस. सी. आर. १०५;** दयाराम- विरुद्ध - सुधीर बाथम आणि इतर (२०१२) १ एस. सी. सी. ३३३ : [२०११] १५ एस. सी. आर. १०९२; जे. चित्रा-विरुद्ध-जिल्हाधिकारी आणि अध्यक्ष, राज्य स्तरीय दक्षता समिती, तामिळनाडू आणि इतर **(२०२१) ९ एस. सी. सी. ८११- संदर्भित.**

विजयकुमार-विरुद्ध-महाराष्ट्र राज्य आणि इतर **(२०१०) १४ एस. सी. सी. ४८९ - बंधनीय उदाहरण नाही.**

शिल्पा विष्णू ठाकूर- विरुद्ध- महाराष्ट्र राज्य **२००९ (३) एम एच. एल. जे. (एफ. बी.) ९९५;** अपूर्वा सुपुत्री विनय निचले -विरुद्ध-विभागीय समिती **२०१० (६) एम एच. एल जे- संदर्भित.**

**प्रकरणात कायद्याचे संदर्भ**

| | | |
|---|---|---|
| **[१९९४] ३ पुरवणी एस. सी. आर ५०** | **विश्वास दर्शविला** | **परिच्छेद २ वर** |
| **[२०११] १५ एस. सी. आर ३८६** | **विश्वास दर्शविला** | **परिच्छेद ४ वर** |
| **[२०१९] १५ एस. सी. आर ६८५** | **विश्वास दर्शविला** | **परिच्छेद ६ वर** |
| **[१९९३] ३ पुरवणी एस.सी.आर ८७२** | **संदर्भित** | **परिच्छेद ७** |
| **[२००६] ८ पुरवणी एस. सी. आर १०५** | **संदर्भित** | **परिच्छेद ८** |
| **[२०११] १५ एस. सी. आर १०९२** | **संदर्भित** | **परिच्छेद ११** |

दिवाणी अपीलीय अधिकारक्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक २५०२/२०२२

मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात दिनांक ०७.०५.२००९ रोजी रिट याचिका क्र. ९६५९/२००७ मध्ये पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

सोबत

दिवाणी अपील क्रमांक २७७२, २५३६-२५३७, २५३३, २५३२, २५३४, २५१८, २५१७, २५२५, २५२०, २५२७, २५२६, २५३८, २५४१, २५३५, २५४६/२०२२, ३९२२-३९२३/२०१९, २५४४-२५४५, २५१२, २५४३, २५४२, २५२९, २५४०, २५३९, २५०३, २५१४, २५१९, २५२४, २५१०, २५०६, २५०९, २५०८, २५०७/२०२२, ८६०३, ८६०५/२०१०, २५०४, २५०५ , २५११, २५३०, २५२२, २५१६, २५२१, २५३१, २५२३, २५२८, २५१३/२०२२, ९३३५/२०१३ आणि २५१५/२०२२.

उपस्थित पक्षकारांतर्फे अधिवक्ता नामे- सुश्री माधवी दिवाण, अतिरिक्त महान्यायअभिकर्ता, श्रीमती व्ही. मोहना, श्री. रवी के. देशपांडे, श्री. शेखर नाफडे, श्री. रवी प्रकाश मेहरोत्रा, श्री. संजय आर. हेगडे, श्रीमती मीनाक्षी अरोरा, श्री. श्याम दिवाण, श्री. आर. बाला, श्री. एम. एन. राव, वरिष्ठ अधिवक्ते; श्री. रजत जोसेफ, श्री. विवेक सी. सोलशे, श्री. वरुण व्ही. सोलशे, श्री. अंजनी कुमार झा, श्री. अभिजीत सिन्हा, मेसर्स लांबट अँड असोसिएट्स, श्री. शाश्वत गोयल, श्री. सत्यजित ए. देसाई, सुश्री अनघा एस. देसाई, श्री. विजय राज सिंग चौहान, अंशु देशपांडे,श्री. सिद्धार्थ गौतम, श्री. गजानन एन. तीर्थकर, श्री. रामेश्वर प्रसाद गोयल, श्री. गगन संघी, सुश्री ऐश्वरिया दाश, डॉ. प्रशांत प्रताप, श्री. चंद्र शेखर अशरी, श्री. अमलान कुमार घोष, सुश्री प्रीती राणे, श्री. आशिष पांडे, श्री. अपूर्व श्रीवास्तव, श्री. शिरीष के. देशपांडे, सुश्री रुचा प्रवीण मंडलिक, श्री. मोहित गौतम, श्री. शाहरुख अली, श्री. अनंता रामटेके, श्री. राहुल शर्मा, श्री. सुधांशु बी चौधरी, श्री. महेश पी. शिंदे, सुश्री रुचा ए. पांडे, श्री. एम. वीराराघवन, सुश्री. फराह हाशमी, सुश्री ऐश्वर्या दाश, श्री. आर. पी. गुप्ता, श्री. आनंद सुकुमार, श्री. क्षितिज मित्तल, श्री. एस. सुकुमारन, श्री. भूपेश कुमार पाठक, सुश्री. मीरा माथुर, श्री. निशांत रमाकांतराव काटणेश्वरकर, श्री. सचिन पाटील, सुश्री. मयुरी रघुवंशी, श्री. व्योम रघुवंशी, सुश्री. आकांशा राठोड, श्री. योगेश मलिक, श्री. रवींद्र केशवराव अडसुरे, श्री. प्रवीण पाटील, श्री. सिद्धेश्वर नामदेव बिरादर, श्री. यश प्रशांत सोनावणे, श्री. सिद्धार्थ

धर्माधिकारी, श्री. आदित्य अनिरुद्ध पांडे, श्री. भरत बागला, सुश्री कीर्ति दधीच, श्री. निकिलेश रामचंद्रन, श्री. गुरमीत सिंह मक्केर, सुश्री. विमला सिन्हा, श्री. अनमोल चंदन, श्री. उदय खन्ना, श्री. प्रतीक आर. बोंबार्डे, श्री. सुभाष कुमार, श्री. धरम दत्त वर्मा, श्री. अभिषेक कुमार, श्री. गोपाल बलवंत साठे, मेसर्स ब्लॅक अँड व्हाईट सॉलिसिटर्स, श्री. सुहासकुमार कदम, श्री. भार्गव व्ही. देसाई, श्री. राहुल गुप्ता, श्री. सिद्धार्थ चौधरी, श्री. उत्कर्ष वत्स, श्री. दीपांशू, सुश्री भारती त्यागी, श्री. जे. एन. सिंग, श्री. सौरभ मिश्रा, श्रीमती साधना सिंग, श्री. अभिषेक सिंग, सुश्री प्रिया कौशिक, श्री. सुदर्श मेनन, श्री. समरेंद्र बेउरा, श्री. राजेश राठोड, सुश्री उषा रानी प्रधान, श्री. अजय कुमार भाटिया, श्री. चिराग एम. श्रॉफ, सुश्री पल्लवी शर्मा, श्री. गौरव अग्रवाल, श्री. अमोल बी. करंदे, श्री. महेश बी. करंदे, श्री. नरेंदर राव थनीर, सुश्री जसवंती, सुश्री आयना वर्मा, श्री. नितीन मेश्राम, श्री. नारायण जांभुळे, श्री. रितेश पाटील, श्री. रनबीर सिंग यादव, श्री. अभिजीत एस. कांबळे, श्री. हितेश कुमार शर्मा, श्री. एस. के. राजोरा, सुश्री निहारिका द्विवेदी, श्री. नरेंदर पाल शर्मा, श्री. अमित कुमार चावला, श्री. रवीश कुमार गोयल, माधवी एस. सावंत.

**न्यायमूर्ती श्री. अभय एस. ओक यांनी दिलेले न्यायनिर्णय :-**

**प्रस्तावना**

१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ ला अनुसरून, संविधान (अनुसूचित जमाती) आदेश, १९५० (थोडक्यात 'अनुसूचित जमाती आदेश') द्वारे अनुसूचित जमातींची यादी अधिसूचित करण्यात आली होती. संसद अधिनियम, १९७६ द्वारे अनुसूचित जमाती आदेशात सुधारणा करण्यात आली. १९७६ च्या अधिनियमाच्या तिसऱ्या अनुसूचीतील भाग IX मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी अधिसूचित अनुसूचित जमातींची यादी आहे. महाराष्ट्राच्या यादीत, नोंद क्र. ४४ वर, खालील जातींना अनुसूचित जमाती म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे :-

"ठाकूर, ठाकर, का ठाकूर, का ठाकर, मा ठाकूर, मा ठाकर".

२. जातीच्या दाव्यांच्या निर्धारणासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीशी संबंधित विविध मुद्दे भरपूर प्रकरणांत उद्भवले. **कुमारी माधुरी पाटील आणि इतर - विरुद्ध-अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास आणि इतर** [१] च्या प्रकरणामध्ये सदर न्यायालयाने नोंद घेतली

की, सामाजिक दर्जा असलेले प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया, त्यांची छाननी आणि त्यांची मंजुरी सुव्यवस्थित करणे आवश्यक आहे. प्रक्रियात्मक मार्गदर्शक तत्त्वे विहित करण्याची गरज भासू लागली कारण अशी अनेक प्रकरणे निदर्शनास आली ज्यामध्ये खोट्या सामाजिक दर्जाच्या प्रमाणपत्रांच्या आधारे उमेदवारांनी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतला जेणेकरून अपरिहार्यपणे अनुसूचित जाती किंवा जमातीच्या अस्सल उमेदवारांना प्रवेशापासून वंचित ठेवण्यात आले. त्यावेळेस असा कोणताही कायदा अंमलात नव्हता ज्याद्वारे जातीच्या दर्जाच्या पडताळणीची प्रक्रिया विहित करण्यात आली असती. म्हणून सदर निर्णयाच्या परिच्छेद १३ मध्ये परिपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे नमूद करण्यात आली होती. सदर निर्णयाच्या परिच्छेद १३ चे संबंधित भाग पुढीलप्रमाणे वाचावे :-

"**१३.** बनावट सामाजिक दर्जाच्या प्रमाणपत्राच्या आधारे चुकीच्या पद्धतीने मिळवलेल्या प्रवेश किंवा नियुक्तीमुळे अस्सल अनुसूचित जाती किंवा जमाती किंवा इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी संविधानाने मनाई केलेल्या सवलतींपासून वंचित ठेवण्याचा अपरिहार्य परिणाम होतो. सामाजिक दर्जा प्रमाणपत्राअभावी अस्सल उमेदवारांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश किंवा राज्यांतर्गत कार्यालये किंवा पदांवर नियुक्ती नाकारली जाते. खोट्या पद्धतीने प्रवेश मिळविणारी अपात्र किंवा बनावट व्यक्ती विलंब करण्याच्या डावपेचांचा अवलंब करतात आणि पडताळणी समितीद्वारे चौकशी पूर्ण करण्यात अडथळे निर्माण करतात. हे खरे आहे की शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी अर्ज सामान्यतः पालकांकडून केले जातात, कारण सहसा त्या तारखेला विद्यार्थी अल्पवयीन असू शकतो. हे जन्मदाते किंवा कायदेशीर पालक आहेत जे बनावट सामाजिक दर्जा प्रमाणपत्राच्या आधारे दावा करून फसवणूक करू शकतात. म्हणून जारी केलेल्या प्रमाणपत्रांची लवकरात लवकर आणि अत्यंत वेगाने आणि तत्परतेने छाननी करणे आवश्यक आहे. **सदर उद्देशासाठी, सामाजिक दर्जाचे प्रमाणपत्र जारी करण्याची प्रक्रिया, त्यांची छाननी आणि त्यांची मंजुरी सुव्यवस्थित करणे आवश्यक आहे, जी खालीलप्रमाणे असू शकते :**

१. सामाजिक दर्जा प्रमाणपत्र मिळण्यासाठी महसूल उपविभागीय अधिकारी आणि उप जिल्हाधिकारी किंवा उपायुक्त यांच्याकडे अर्ज केले जातील आणि प्रमाणपत्रे

तालुका किंवा मंडळ स्तरावरील अधिकाऱ्याऐवजी अशा अधिकाऱ्यांद्वारे दिली जातील.

२. यथास्थिती जन्मदाते, कायदेशीर पालक किंवा उमेदवार, सक्षम राजपत्रित अधिकारी किंवा अराजपत्रित अधिकाऱ्याद्वारे योग्यरित्या शपथ घेतलेले आणि साक्षांकित केलेले प्रतिज्ञापत्र, जाती आणि पोटजाती, जमात, आदिवासी समुदाय, जमाती किंवा आदिवासी समुदायांचे काही भाग किंवा गट, तो मूळचा ज्या ठिकाणचा आहे आणि संबंधित संचालनालयाने विहित केलेल्या इतर तपशीलांसह दाखल करावे.

३. पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेण्याच्या किंवा एखाद्या पदावर नियुक्त होण्याच्या किमान सहा महिने अगोदर दाखल करावे.

४. सर्व राज्य सरकारे पुढीलप्रमाणे या तीन अधिकाऱ्यांची एक समिती प्रस्थापित करतील - (I) अतिरिक्त किंवा सह-सचिव किंवा संबंधित विभागाच्या संचालकाच्या पदावरील उच्च दर्जाचा कोणताही अधिकारी, (II) यथास्थिती संचालक, समाज कल्याण/आदिवासी कल्याण /मागासवर्गीय कल्याण, (III) अनुसूचित जातींच्या बाबतीत, ज्यांना सामाजिक दर्जा प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याबद्दल आणि ते जारी करण्याबद्दल सखोल माहिती आहे असा इतर अधिकारी. अनुसूचित जमातींच्या बाबतीत, असा संशोधन अधिकारी ज्याला जमाती, आदिवासी समुदाय, जमाती किंवा आदिवासी समुदायांचे भाग किंवा गट ओळखण्याबद्दल सखोल माहिती आहे.

५. **प्रत्येक संचालनालयाने सामाजिक दर्जाच्या दाव्यांची चौकशी करण्यासाठी एक दक्षता विभाग प्रस्थापित केला पाहिजे, ज्यामध्ये एकूण प्रभारी वरिष्ठ पोलीस उपअधीक्षक आणि अश्या संख्येत पोलीस निरीक्षक असतील.** निरीक्षक हे उमेदवाराच्या स्थानिक निवासस्थानाच्या ठिकाणी आणि त्याचे मूळ ठिकाण जेथून तो आलेला आहे आणि तो सहसा राहतो किंवा गाव किंवा शहरात स्थलांतरित झाला असेल, तर तो मूळ ठिकाण जेथून तो आलेला आहे, तेथे जाईल. दक्षता अधिकाऱ्याने यथास्थिती, उमेदवार किंवा जन्मदाते किंवा कायदेशीर पालक यांनी

दावा केलेल्या स्थितीची सर्व तथ्ये वैयक्तिकरित्या पडताळली पाहिजेत आणि गोळा केली पाहिजेत. त्याने शालेय अभिलेख, जन्म नोंदणी असल्यास तीदेखील तपासली पाहिजेत. **त्यांनी जन्मदाते किंवा कायदेशीर पालक किंवा उमेदवार यांची जात इत्यादीच्या संबंधात किंवा उमेदवाराच्या सामाजिक दर्जाची माहिती असलेल्या अशा इतर व्यक्तींची देखील तपासणी करावी आणि नंतर विशेषत: अनुसूचित जमातींमध्ये संबंधित जाती किंवा जमाती किंवा आदिवासी समुदायाद्वारे त्यांच्या विशिष्ट मानववंशशास्त्रीय आणि वांशिक वैशिष्ट्यांशी संबंधित, देवता, विधी, चालीरीती, विवाह पद्धती, मृत्यू समारंभ, मृतदेह दफन करण्याची पद्धत इत्यादीबद्दल अहवाल, प्रपत्रात अभिप्रेत असलेल्या सर्व तपशीलांसह संचालनालयाला सादर करावा.**

६. संबंधित संचालकाला, दक्षता अधिकाऱ्याकडून अहवाल मिळाल्यावर, जर त्याला सामाजिक दर्जाचा दावा 'अप्रामाणिक' किंवा 'संशयास्पद' किंवा बनावट किंवा खोटा किंवा चुकीचा दावा असलेला आढळला, तर संबंधित संचालकाने दक्षता अधिकाऱ्याच्या अहवालाची प्रत उमेदवाराला नोंदणीकृत डाकद्वारे पोचपावतीसह किंवा उमेदवार ज्या शैक्षणिक संस्थेत शिकत आहे किंवा नोकरी करत आहे त्या संस्थेच्या प्रमुखाद्वारे पुरवून, कारणे दाखवा नोटीस जारी करावी. नोटीसमध्ये सूचित केले पाहिजे की निवेदन किंवा उत्तर द्यायचे असेल तर, नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत, विनंती केल्यावर नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा जास्त नसावे. जर उमेदवार सुनावणीची संधी मागत असेल आणि त्या वतीने चौकशी करण्याचा दावा करत असेल, तर असे निवेदन/उत्तर मिळाल्यावर संचालक हे समितीची आणि सह/अतिरिक्त सचिवांची अध्यक्ष म्हणून बैठक घेईल, जे उमेदवार/जन्मदाते /कायदेशीर पालक यांना त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ सर्व पुरावे सादर करण्याची वाजवी संधी देतील. ढोल वाजवून किंवा इतर कोणत्याही सोयीस्कर पद्धतीने गावात किंवा परिसरात सार्वजनिक सूचना प्रकाशित केली जाऊ शकते आणि जर कोणत्याही व्यक्तीने किंवा संघटनेने अशा दाव्याला विरोध केला तर त्याला पुरावा सादर करण्याची संधी दिली जाऊ शकते. वैयक्तिकरित्या किंवा अधिवक्त्याच्या

माध्यमातून अशी संधी दिल्यानंतर, समिती त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करू शकते आणि उमेदवार किंवा विरोधकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात दाव्यांचा विचार करू शकते आणि त्याच्या समर्थनार्थ संक्षिप्त कारणांसह योग्य आदेश देऊ शकते.

७. जर अहवाल उमेदवाराच्या बाजूने असेल आणि तो अस्सल आणि खरा असल्याचे आढळून आले, तर जेथून अहवाल किंवा दिलेले तपशील प्राप्त केले आहेत किंवा खोटे किंवा फसव्या पद्धतीने मिळवले आहेत त्या व्यतिरिक्त पुढील कोणतीही कारवाई करण्याची आवश्यकता नाही आणि नंतरच्या घटनेत परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन केले जाईल.

८. परिच्छेद ६ मध्ये अभिप्रेत असलेली नोटीस, जर उमेदवार अल्पवयीन असेल तर त्याचे जन्मदाते /कायदेशीर पालकांना त्याच्या किंवा त्यांच्या सामाजिक दर्जाच्या प्रमाणपत्राच्या दाव्याच्या समर्थनार्थ सर्व पुराव्यांसह समितीसमोर हजर राहण्यासाठी जारी केली जावी.

९. ..............

१०. ..............

११. समितीने पारित केलेला आदेश केवळ राजघटनेच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत कार्यवाहीच्या अधीन राहून अंतिम आणि निर्णायक असेल.

१२. इतर कोणत्याही प्राधिकरणासमोर कोणताही खटला किंवा इतर कार्यवाही होऊ नये.

(यावर भर देण्यात आला आहे)

३. वरील मार्गदर्शक तत्त्वे स्पष्टपणे राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत अधिकारक्षेत्राच्या वापराच्या अधीन राहून तयार केली गेली होती कारण या न्यायालयाला असे आढळले की या क्षेत्रात कोणतेही कायदे कार्यान्वित नव्हते. महाराष्ट्र राज्याचा विचार करता, १८ ऑक्टोबर २००१ पासून महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग जातीचे (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० (थोडक्यात '२००० कायदा') लागू

करण्यात आला. २००० च्या कायद्यात मागासवर्गीयांच्या विविध श्रेणींमधील व्यक्तिंना जात प्रमाणपत्रांच्या देण्यासाठी व त्याची पडताळणीसाठी एक अतिशय विस्तृत यंत्रणा आहे. एक द्विस्तरीय यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पहिला स्तर सक्षम प्राधिकरणाचा आहे ज्यांच्याद्वारे जातीचे प्रमाणपत्र जारी करण्यात येते आणि ते २००० च्या कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या छाननी समितीने पडताळणी आणि वैधता प्रमाणपत्र मंजूर करण्याच्या अधीन आहे. सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या जाती प्रमाणपत्रांच्या अचूकतेची पडताळणी करण्यासाठी कलम ६ अंतर्गत स्थापन केलेल्या छाननी समितीकडे अधिकार निहित आहेत. कलम ९ अंतर्गत सक्षम प्राधिकरण आणि छाननी समितीला दिवाणी न्यायालयाला असलेले साक्षीदारांना समन्स पाठवणे व हजर राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास भाग पाडणे, शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे, कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवून घेणे आणि साक्षीदारांची तपासणी किंवा दस्तऐवज दाखल करण्यासाठी राजादेश काढणे यांसारखे अधिकार प्रदान करते. २००० च्या कायद्यांतर्गत नियम बनवण्याच्या अधिकाराचा वापर महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र ( देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२००३ (थोडक्यात 'एस टी' (ST) नियम') तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम,२०१२ (थोडक्यात 'एस सी ' (SC ) नियम') तयार करण्यात आले. छाननी समिती स्थापन करण्यासाठी विस्तृत तरतुदी तसेच सक्षम प्राधिकरण आणि छाननी समितीद्वारे पाळली जाणारी कार्यपद्धती दोन्ही श्रेणींसाठी लागू असलेल्या नियमांद्वारे निश्चित करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या नियमांच्या नियम १० आणि नियम १२ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या छाननी समित्यांना चौकशी करण्यास मदत करण्यासाठी दक्षता पथक स्थापन करण्याची तरतूद आहे. एस. टी. नियमांनुसार स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकामध्ये पोलीस निरीक्षक आणि संशोधन अधिकाऱ्याला मदत करण्यासाठी वरिष्ठ पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई यांचा समावेश असतो. एस. सी. नियमांमध्ये विशेषतः दक्षता पथकाला आप्तभाव चाचणी घेण्याची तरतूद आहे. एस. टी. नियमांतर्गत स्थापन केलेल्या दक्षता पथकाला आप्तभाव चाचणी घेण्याचा

अधिकार आहे की नाही याबद्दल काही वाद आहेत. आम्ही हा मुद्दा हाताळत आहोत. दक्षता पथकाने संबंधित जाती किंवा जमाती किंवा आदिवासी समुदायांकडून मानवशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय वैशिष्ट्ये, देवता, विधी, चालीरीती, विवाहाची पद्धत, अंतिम संस्कार, मृतदेहांची विल्हेवाट लावण्याची पद्धत इत्यादींची चौकशी करणे आवश्यक आहे. आप्तभाव चाचणीचा एक भाग म्हणून, ज्या उमेदवाराने सक्षम प्राधिकरणाकडून जातीचे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, त्याला विशिष्ट जात/जमातीशी संबंधित उपरोक्त घटकांबद्दल माहिती आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी त्याची चाचणी घेतल्या जाते.

**वाद**

४. २४ मार्च २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार, सध्याच्या प्रकरणांचा गट पूर्ण खंडपीठाकडे पाठवण्यात आला. मुख्य प्रकरणासमोरील (२०२२ चे दिवाणी अपील क्रमांक २५०२) आव्हान हे **शिल्पा विष्णू ठाकूर -विरुद्ध - महाराष्ट्र राज्य**[२]**.** या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने दिलेला निर्णय हा आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने २००० च्या कायद्याच्या तरतुदींचा तसेच एस टी (ST) नियमांचा अर्थ लावला आहे. आक्षेपित न्यायनिर्णयात छाननी समितीने पाळाव्या लागणाऱ्या विविध प्रक्रियात्मक पैलूंवर चर्चा केली आहे आणि ते नमूद केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने असे म्हटले आहे की आप्तभाव चाचणी हा जातीच्या दाव्याबद्दलची अचूकता निर्धारण करण्यासाठीचा अविभाज्य भाग आहे. २४ मार्च २०२२ रोजीच्या आदेशात, या न्यायालयाच्या खंडपीठाने नमूद केले आहे की या न्यायालयाच्या समकक्ष खंडपीठांच्या दोन निर्णयांमध्ये व्यक्त केल्या गेलेल्या मतांमध्ये विरोधाभास होता. पहिले प्रकरण हे **विजकुमार -वि. महाराष्ट्र राज्य आणि इतर**[३] हे आहे आणि दुसरे प्रकरण हे **आनंद -वि.- जमातीच्या दाव्यांची छाननी आणि पडताळणी समिती आणि इतर**[४] हे आहे. **विजकुमार**[३] या प्रकरणातील निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये, या न्यायालयाने असे म्हटले आहे की जर एखादा उमेदवार आप्तभाव चाचणीच्या कोणत्याही टप्प्यावर अनुत्तीर्ण झाला तर त्याला जात वैधता प्रमाणपत्र दिले जाऊ शकत नाही. **आनंद**[४] च्या बाबतीत, असे म्हटले गेले की सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे जातीचा दावा ठरवण्यासाठी आप्तभाव चाचणी हा एकमेव निकष नाही. कागदोपत्री पुराव्याची पुष्टी करण्यासाठी त्याचा वापर केला जाऊ शकतो, असे मत मांडण्यात आले. सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या जात प्रमाणपत्राच्या

आधारे जातीच्या दाव्यावर निर्णय घेताना आत्मीयता चाचणीला सर्वोच्च महत्त्व दिले पाहिजे का हा निर्णय घ्यायचा प्रश्न आहे. दुसऱ्या शब्दांत, प्रश्न असा आहे की आत्मीयता चाचणी ही जातीचा दावा ठरवण्यासाठीची  लिटमस चाचणी आहे का?

**पक्षकारांचे युक्तिवाद :-**

५. अपीलकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील शेखर नाफडे यांनी २०२२ च्या दिवाणी अपील क्रमांक २५०२ मध्ये मुख्य निवेदने सादर केली आहेत. त्यांनी आम्हाला २००० चा कायदा आणि एस. टी.(ST ) नियम संपूर्णपने ज्ञात करून दिला आहे. **कुमारी माधुरी पाटील**[१] च्या प्रकरणातील निर्णयावर भर देत त्यांनी संविधानपूर्व काळाशी संबंधित कागदपत्रांना सर्वात जास्त पुरावा मूल्य असल्याचे  निदर्शनास आणून दिले. जातीच्या दाव्याच्या समर्थनार्थ अशी कागदपत्रे छाननी समितीसमोर सादर केली गेली आणि ती संबंधित आणि अस्सल असल्याचे आढळून आले तर छाननी समितीला दक्षता पथकाद्वारे चौकशीचे आदेश देण्याची संधी नाही, असे ते सादर करतात. त्याचप्रमाणे, जात छाननी समितीसमोर पडताळणीसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीच्या रक्ताच्या नातेवाईकांना जातीची वैधता प्रमाणपत्रे देण्यात आली असतील, तर छाननी समितीकडून पुढील चौकशीची मागणी केली जात नाही. दोन्ही प्रकरणांमध्ये, जात प्रमाणपत्र प्रमाणित करणे हे जात छाननी समितीचे कर्तव्य आहे. त्यांनी एस. टी.(ST ) नियमांच्या नियम १२ कडे आमचे लक्ष वेधले, ज्यामध्ये छाननी समितीने पाळायची प्रक्रिया नमूद केली आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की उप-नियम (२) मध्ये अशी तरतूद आहे की जर छाननी समिती अर्जदाराने सादर केलेल्या दस्तावेजी पुराव्यावर समाधानी नसेल तरच ती दक्षता पथकाद्वारे चौकशीचे आदेश देऊ शकते. अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे जातीचा दावा सिद्ध करण्यासाठी पुरेशी नाहीत या निष्कर्षावर छाननी समिती आल्यानंतरच हे प्रकरण दक्षता पथकाकडे पाठवल्यानंतरच आप्तभाव चाचणी घेण्याचा प्रश्न उद्भवतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे जातीचा दावा सिद्ध करण्यासाठी पुरेसा नाही याचे समाधान नोंदवल्याशिवाय छाननी समिती यांत्रिकरित्या प्रकरण दक्षता पथकाकडे  पाठवू शकत नाही, असे त्यांनी सादर केले.

६. **अपूर्वा विनय निचळे - विरुद्ध- विभागीय समिती**[५] या खटल्यातील मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर त्यांनी भर दिला. त्यांनी सादर केले की जर एखादा अर्जदार संविधानपूर्व कालावधीशी संबंधित कागदपत्रांच्या आधारे किंवा त्याच्या रक्त नातेवाईकाला

दिलेल्या पुरावा मूल्य असलेल्या कागदपत्रांच्या किंवा जात वैधतेच्या प्रमाणपत्राच्या आधारे त्याचा जातीचा दावा यशस्वीरित्या स्थापित करत असेल तर आप्तभाव चाचणी लागू करणे आवश्यक नाही. थोडक्यात, त्यांचे म्हणणे असे आहे की आप्तभाव चाचणी ही लिटमस चाचणी नाही. **आनंद**[४] च्या प्रकरणात या न्यायालयाने घेतलेला दृष्टिकोन २००० चा कायदा आणि एस. टी. नियमांच्या अन्वयार्थावर आधारित आहे, असे त्यांनी सांगितले. एस. टी. नियम लागू होण्यापूर्वी या न्यायालयाने **विजकुमारच्या**[३] प्रकरणांचा निर्णय दिल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. ते पुढे म्हणाले की प्रत्येक प्रकरणात आप्तभाव चाचणी अनिवार्य आहे असे सूचित करण्यासाठी निर्णयात कोणतेही कारण नोंदवण्यात आले नाही. विद्वान वकिल यांनी **जिल्हाधिकारी, सातारा आणि इतर -विरुद्ध- मंगेश निवृत्ती काशीद**[६] या प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दबाव आणला. त्यांनी निदर्शनास आणून दिले की या न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे की प्रत्येक प्रकरणात दक्षता पथकाची मदत घेणे आवश्यक नाही, परंतु जेव्हा छाननी समिती अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवर समाधानी नसते तेव्हाच. अनुसूचित जमातीचा सदस्य असलेला आणि नागरी क्षेत्र भागात राहत असलेला अर्जदार कदाचित जमातीची वैशिष्ट्ये, विशेषता, समारंभ आणि देवतांशी परिचित नसतो याकडेही त्यांनी लक्ष वेधले. विद्वान ज्येष्ठ वकिलांनी १ ऑगस्ट २०१८ रोजी २००५ च्या लेखी याचिकेतील मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर देखील भर दिला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की **आनंद**[४] च्या प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयाच्या दृष्टीने, **शिल्पा विष्णू ठाकूर**[२] च्या प्रकरणातील आक्षेपित न्यायनिर्णय अप्रत्यक्षपणे फेटाळला गेला आहे. त्यामुळे ते असे म्हणतात की आक्षेपित न्यायनिर्णयात बदल करण्याची गरज आहे आणि २००० च्या कायदा आणि अनुसूचित जमातीच्या नियमांनुसार जातीच्या दाव्याचा निर्णय घेताना आप्तभाव चाचणीला सर्वोच्च महत्त्व नाही असे मानले पाहिजे.

७. संबंधित प्रकरणात उपस्थित असलेल्या विद्वान ज्येष्ठ वकील श्रीमती व्ही. मोहना यांनी **पालघाट जिला थंदन समुदाय संरक्षण समिती आणि इतर -विरुद्ध- केरळ राज्य**[७] या प्रकरणतील या न्यायालयाच्या निर्णयावर मोठ्या प्रमाणात भर दिला. काही विशिष्ट समुदाय एस. टी.(ST) आदेशाच्या अंतर्गत येतात की नाही हे ठरवण्यासाठी राज्य सरकार किंवा छाननी समिती कोणतीही चौकशी करू शकत नाही, असे त्यांनी सादर केले. राज्य सरकार एस. टी. (ST) आदेशांतर्गत तिसऱ्या अनुसूचीमध्ये अप्रत्यक्षपणे बदल करण्याचा प्रयत्न करू

शकत नाही, कारण राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४१  नुसार केवळ हे बदल केले जाऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. त्यांचे म्हणणे असे आहे की दिलेल्या प्रकरणात जर पुरावा मूल्य असलेल्या दस्तऐवजांवरून असे दिसून येते की अर्जदार ठाकूर जातीचा आहे किंवा १९७६ च्या कायद्याच्या तिसऱ्या अनुसूचीत अधिसूचित केलेल्या इतर कोणत्याही जातीचा आहे, तर कोणतीही आप्तभाव चाचणी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

८.	महाराष्ट्र राज्याची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्याम दिवाण यांनी निदर्शनास आणून दिले की ठाकूर हे अडनाव पुढारलेल्या आणि मागासलेल्या अशा दोन्ही समुदायांमध्ये सामायिक आहे हे न्यायालयीनदृष्ट्या मान्य आहे. त्यांनी **महाराष्ट्र राज्य आणि- इतर- विरुद्ध रवी प्रकाश बाबूलालसिंग परमार आणि अन्य**[८] यांच्या प्रकरणातील निर्णयावर भर दिला. त्यांनी असे  निदर्शनास आणून दिले की आक्षेपित न्यायनिर्णयातही हा तथ्यात्मक पैलू तपशीलवार हाताळला गेला आहे. २००० च्या कायद्यातील तरतुदींनुसार तीन टप्प्यांवर चौकशी होणे आवश्यक आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. प्रथम, अर्जदाराने सादर केलेल्या दस्तऐवजांच्या आधारे त्याच्या दाव्याचा खरेपणा निश्चित करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाद्वारे चौकशी केली जाते. जर प्रथमदर्शनी सक्षम प्राधिकरण कागदपत्रांवर समाधानी असेल तर त्याला जात प्रमाणपत्र द्यावे लागते जे पडताळणीच्या अधीन असते. दुसरा टप्पा दक्षता पथकाद्वारे केल्या जाणाऱ्या कौटुंबिक आणि शालेय चौकशीचा आहे ज्यामध्ये आप्तभाव चाचणीचा समावेश असतो आणि तिसरा टप्पा अर्ध-न्यायिक प्राधिकरण असलेल्या छाननी समितीद्वारे पडताळणी आणि छाननीचा आहे.

९.	त्यांनी दाखल केलेल्या लेखी निवेदनात त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की अर्जदाराच्या जवळच्या नातेवाईकांना छाननी समितीने जरी वैधता प्रमाणपत्रे जारी केली असली तरी, छाननी समितीने संपूर्ण पुराव्याचे मूल्यांकन करण्याच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग म्हणून आप्तभाव चाचणी लागू करावी लागेल जेणेकरून अवैधता कायम राहणार नाही. चुकून किंवा फसवणुकीने किंवा कायद्याने तरतूद केल्याप्रमाणे चौकशी न करता किंवा अभिलेखावर कोणतेही कारण न देता जवळच्या नातेवाईकाला वैधता प्रमाणपत्र दिले जाते अशी प्रकरणे आहेत, असे त्यांनी सादर केले. उच्च न्यायालयाच्या चुकीच्या आदेशाच्या आधारे पूर्वीचे वैधता प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे का या प्रश्नावर छाननी समिती वर

संशय व्यक्त केल्या जाऊ शकतो, असे निवेदन करण्यात आले. **आनंद प्रकरण**[४] मधील निर्णयातील परिच्छेद २२.१ मध्ये जे नमूद केले आहे ते चुकीचे आहे.

१०. राज्य सरकारच्या वतीने असे सादर करण्यात आले की सद्याच्या प्रकरणात, अर्जदार जमातीचे वैशिट्ये, धार्मिक समारंभ किंवा देवता इत्यादींशी पूर्णपणे परिचित नसावा. त्यामुळे दक्षता पथकाने अर्जदाराच्या पालकांचीही तपासणी करणे आवश्यक आहे. राज्य सरकारने निवेदन केले की ठाकूर अनुसूचित जमातीच्या बाबतीत, एक वेगळी चाचणी लागू केली जाईल कारण हे अडनाव असलेल्या व्यक्ती पुढारलेल्या वर्गामध्ये सुद्धा आहेत. त्यामुळे, ठाकूर या जमातीच्या दाव्याच्या बाबतीत, उमेदवाराचे आडनाव ठाकूर असलेल्या संविधानपूर्व कागदपत्रांचा कोणताही परिणाम होत नाही. म्हणून, ठाकूरच्या जमातीच्या दाव्याच्या बाबतीत, आप्तभाव चाचणी लागू करावी लागेल. राज्याची विनंती आहे की, **विजकुमार**[३] या प्रकरणात घेतलेला दृष्टिकोन योग्य आहे आणि **आनंद**[४] या प्रकरणात परिच्छेद २२ मध्ये सादर केलेल्या निष्कर्षांविषयी आवश्यक स्पष्टीकरण जारी करावे लागेल.

११. संबंधित प्रकरणांपैकी एका प्रकरणात उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील रवी के. देशपांडे यांनी २००० च्या कायद्यांतर्गत स्थापन केलेली छाननी समिती अर्ध-न्यायिक प्राधिकरण नाही, असे निवेदन केले. **दयाराम -वि.- सुधीर बाथम आणि इतर**[९] प्रकरणातत्यांनी ते सादर केले. या न्यायालयाने असे म्हटले की छाननी समिती ही अर्ध-न्यायिक प्राधिकरण नाही तर ती एक प्रशासकीय प्राधिकरण आहे. **जे. चित्रा -विरुद्ध- जिल्हाधिकारी आणि अध्यक्ष, राज्य पातळी दक्षता समिती, तामिळनाडू आणि इतर**[१०] प्रकरणात या न्यायालयाने **दयाराम**[९] प्रकरणातील न्यायनिर्णयाचे पालन केले आहे, असे निवेदन त्यांनी केले. त्यांनी सादर केले की आप्तभाव चाचणी हा छाननी समितीच्या चौकशीचा अविभाज्य भाग आहे या उच्च न्यायालयाच्या निष्कर्षाला कोणताही कायदेशीर आधार नाही. **आनंद**[४] प्रकरणामध्ये योग्य न्यायनिर्णय घेण्यात आला आहे आणि त्या मर्यादेपर्यंत, **शिल्पा विष्णू ठाकूर**[२] प्रकरणातील आक्षेपित न्यायनिर्णयात बदल करावा लागेल, असे त्यांचे म्हणणे आहे. हस्तक्षेप करणाऱ्यांपैकी एकाने एस. सी. (ST) नियमांच्या तरतुदींवरही भर दिला आणि सादर केले की जरी ते विशेषत्वाने दक्षता पथकाला आप्तभाव चाचण्या घेण्याचे अधिकार देत असले, तरी अशी तरतूद एस टी (ST ) नियमांमध्ये नाही.

**<u>आमचा दृष्टिकोन</u>**

१२. **कुमारी माधुरी पाटील**[१] प्रकरणात या न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशांचा आम्ही आधीच तपशीलवार संदर्भ दिला आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या जातीच्या दाव्यांच्या पडताळणीचे क्षेत्र नियंत्रित करणारा कोणताही कायदा नसल्यामुळे **कुमारी माधुरी पाटील प्रकरण**[१] या प्रकरणातील निकालात परिच्छेद १३ मध्ये या न्यायालयाने जारी केलेले निर्देश समकक्ष खंडपीठाने **दयाराम**[९] या प्रकरणामध्ये आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ३५ द्वारे जारी केले केले होते. त्यामुळे **कुमारी माधुरी पाटील**[१] प्रकरणामध्ये जारी केलेले निर्देश योग्य कायदा होईपर्यंतच लागू राहतील, असा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे त्यानंतर २००० चा कायदा लागू झाल्यामुळे, केवळ उक्त अधिनियमाच्या तरतुदीच प्रभावी ठरतील.

१३. त्यामुळे आपल्याला २००० च्या कायद्याच्या तरतुदींचा अर्थ लावावा लागेल. २००० चा कायदा १८ ऑक्टोबर २००१ रोजी अंमलात आला. शीर्षकावरूनच लक्षात येते की, २००० चा कायदा अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तिंच्या संदर्भात जात प्रमाणपत्रे जारी करण्याचे आणि पडताळणीचे नियमन करण्याशी संबंधित आहे. २००० च्या अधिनियमाच्या कलम २ (ब) मध्ये परिभाषित केलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे जात प्रमाणपत्रे देण्यासाठी अर्ज करावा लागतो. सक्षम प्राधिकरणाला नियमांद्वारे निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन करणे बंधनकारक आहे. विहित कार्यपद्धतीचे पालन केल्यानंतर, उमेदवाराने केलेला दावा खरा असल्याचे सक्षम प्राधिकरणाचे समाधान झाल्यास, ते विहित नमुन्यात जात प्रमाणपत्र जारी करू शकतात. कलम ४ चे पोट -कलम (१) नुसार, चांगल्या कारणांसाठी, विशेषतः अशी तरतूद करण्यात आली आहे की जर अर्ज नाकारला गेला तर नाकारण्याची कारणे नोंदवली जाणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र मंजूर करण्यासाठीचा अर्ज फेटाळण्याचा आदेश कलम ५ च्या पोट-कलम (१) अंतर्गत अपील करण्यायोग्य असल्याने, अपील प्राधिकरणाला नाकारण्याच्या कारणांचा लाभ मिळाला पाहिजे.

१४. कलम ९ अंतर्गत, सक्षम प्राधिकरण, अपील प्राधिकरण आणि छाननी समितीला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत, ज्यामध्ये कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे

आणि त्याची शपथेवर तपासणी करणे, कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास भाग पाडणे शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे, कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवून घेणे. आणि साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी राजदेश काढणे. तथापि, सक्षम प्राधिकरण आणि छाननी समितीने करणे आवश्यक असलेल्या चौकशीचे स्वरूप आणि व्याप्ती भिन्न आहे. २००० च्या अधिनियमाने जातीच्या दाव्यांच्या पडताळणीसाठी द्विस्तरीय प्रणाली सुरू केली आहे. कलम ४ च्या उपकलम (२) मध्ये वापरलेली स्पष्ट भाषा लक्षात घेता, सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले जात प्रमाणपत्र अर्जदाराच्या जातीच्या दाव्याला निर्णायकपणे सिद्ध करत नाही.  सक्षम प्राधिकाऱ्याने ज्या व्यक्तीला जात प्रमाणपत्र दिले आहे, ती व्यक्ती तीला जातीचा दर्जा प्राप्त झाल्याचा दावा करू शकत नाही. सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले जात प्रमाणपत्र २००० च्या अधिनियमामध्ये पूर्वकल्पित केल्याप्रमाणे तपशीलवार चौकशीनंतर आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांची पडताळणी समितीने चौकशी केल्यानंतर आणि प्रमाणपत्र प्रमाणित झाल्यानंतरच त्यात नमूद केलेल्या जातीचा निर्णायक पुरावा बनते. त्यामुळे जेव्हा कलम ३ अंतर्गत जाती प्रमाणपत्र देण्यासाठी केलेल्या अर्जाचा सक्षम प्राधिकाऱ्याकडून विचार केला जातो, तेव्हा अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यांची अतिशय तपशीलवार छाननी करण्याचा विचार केला जात नाही. जातीच्या दाव्याच्या अस्सलतेचे प्रथमदर्शनी समाधान आणि अशा समाधानाच्या आधारे विचार केला जातो की कलम ४ च्या पोट-कलम (१) मध्ये पूर्वकल्पित केल्याप्रमाणे जाती प्रमाणपत्र जारी केले जाऊ शकते. त्यामुळे, कलम ४ च्या उपकलम (१) प्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने विनिर्देशपूर्वक अर्ज नाकारण्याची कारणे नोंदवणे आवश्यक आहे, परंतु जाती प्रमाणपत्र देताना कारणे देण्याची अशी कोणतीही आवश्यकता समाविष्ट केलेली नाही. तथापि, जाती पडताळणी समितीने जाती प्रमाणपत्र प्रमाणित करण्यासाठी आणि प्रमाणित न करण्यासाठी दोन्ही कारणे नोंदवणे अपेक्षित आहे. एस टी (ST ) नियमावलीतील  नियम ४ च्या उप-नियम (६) मध्ये अशी तरतूद आहे की सक्षम प्राधिकारी हे अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची मूळ कागदपत्रांशी पडताळणी करेल आणि अर्जदाराने सादर केलेली माहिती, कागदपत्रे आणि पुराव्याच्या खरेपणाबद्दल समाधानी असल्यास, सदर अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र जारी करेल.  या नियमांतर्गत निश्चित केलेली

कालमर्यादा देखील एक सूचक आहे, जी सुचविते की सक्षम प्राधिकाऱ्याने एक संक्षिप्त चौकशी करावयाची आहे आणि सविस्तर चौकशी अभिप्रेत नाही. १५ दिवसांच्या आत जात प्रमाणपत्र देण्याचे आदेश सक्षम प्राधिकाऱ्याने पडताळणी समितीच्या बरोबरीने सविस्तर चौकशी करावयाचे असल्यास पूर्ण होऊ शकत नाही.

१५. सदर कायद्यानुसार छाननी समितीद्वारे जातीच्या दाव्याची अतिशय तपशीलवार छाननी करणे अभिप्रेत आहे. जर सक्षम प्राधिकारी आणि जात पडताळणी समिती या दोघांनाही जातीच्या दाव्यांची समान प्रमाणात छाननी आणि तपशीलवार चौकशी करावयाची असेल तर द्विस्तरीय छाननीचा उद्देशच निष्फळ होईल. कलम ८ मध्ये अशी तरतूद आहे की सक्षम प्राधिकारी आणि पडताळणी समितीसमोर जातीचा दावा सिद्ध करण्याचा भार अर्जदारावर आहे. सक्षम प्राधिकाऱ्यासमोर भारपासून मुक्त होण्यासाठी, जर अर्जदाराने त्याचा जातीचा दावा खरा आहे हे दाखवण्यासाठी सकृतदर्शनी पुरावे सादर केले तर ते पुरेसे आहे. पडताळणी समितीसमोर आपण त्या जातीचे आहोत हे सिद्ध करण्यासाठी कलम ८ द्वारे अर्जदारावर टाकलेले भार हे सक्षम प्राधिकाऱ्यासमोर भारपासून मुक्त होण्यापेक्षा खूप जास्त आहे.

१६. कलम १० च्या पोट-कलम (१) मध्ये असे नमूद केले आहे की जर एखाद्या अर्जदाराला सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी किंवा शैक्षणिक संस्थेतीमध्ये प्रवेश यासारखे कोणतेही लाभ मिळाले तर पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र रद्द केल्यावर शैक्षणिक संस्थेत किंवा नोकरीत मिळवलेले प्रवेश त्वरित रद्द करणे आवश्यक आहे. कलम १० नुसार असे अभिप्रेत आहे की अर्जदार सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे त्याला मिळालेला कोणताही लाभ धारण करू शकत नाही जे नंतर पडताळणी समितीने रद्द केले आहे.

१७. कलम ६ हे जात प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी जात छाननी समितीने अनुसरण करावयाच्या कार्यपद्धतीशी संबंधित आहे. कलम ६ च्या पोट-कलम (४) मध्ये असे नमूद केले आहे की छाननी समिती २००० च्या कायद्यांतर्गत तयार केलेल्या नियमांनुसार निर्धारित केलेल्या प्रक्रियेचे पालन करेल. एस. टी. नियमांच्या नियम ४ मध्ये सक्षम प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती नमूद केली आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की

नियम १० अंतर्गत अनुसूचित जमाती जात छाननी समितीला चौकशी करण्याकरता सहाय्य करण्यासाठी दक्षता पथक स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे, दक्षता पथकामध्ये प्रदान केल्याप्रमाणे तीन वेगवेगळ्या पदांचे पोलिस अधिकारी आणि एक संशोधन अधिकारी असतो. नियम ११ मध्ये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची सत्यापन करण्यासाठी अर्जदाराने सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील प्रवेश आला आहे. नियम ११ चे पोट-नियम २ आणि ३ खालील प्रमाणे आहे :-

"११.(१)..........................

(२) अर्जदार त्याच्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी त्याच्या अर्जासोबत पुढील दस्तऐवज सादर करील:-

(ए ) मूळ दस्तऐवज .---

(i ) एका सांक्षांकित प्रतीसह, अर्जदाराचे मूळ अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र;

(ii ) नमुना- " फ ” मधील शपथपत्र;

(बी) अर्जदाराच्या संदर्भातील दस्तऐवजांच्या सांक्षांकित प्रती--

(i ) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

(ii ) शाळा प्रवेशाच्या नोंदवहीचा उतारा

(iii ) जन्म नोंदवहीचा उतारा

(सी) वडिलांबाबतचे दस्तऐवज ---

(i ) जन्मनोंदवहीचा उतारा

(ii ) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र

(iii ) शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा

(iv) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र

(v) वडील सेवेत असल्यास, सेवा पुस्तकाच्या ज्या पृष्ठांवर धर्म व जमातीची नोंद असेल त्या पृष्ठांचा उतारा

(vi) वडील अशिक्षित असल्यास, अर्जदाराच्या वडिलांच्या बाजूकडील वयस्क रक्तसंबंधित नातेवाईकाचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आणि शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा.

(डी ) अन्य दस्तऐवज .---

(i ) जन्म नोंदवही, ७/१२ चा उतारा, विक्री विलेख इत्यादी सारखा महसुली अभिलेख.

(ii ) त्याच्या अनुसूचित जमातीसंबंधीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ असलेले अन्य कोणतेही संबंधित दस्तऐवज.

(iii ) अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ अर्जदाराच्या जवळच्या ज्या नातेवाईकांची वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्यांची शपथपत्रे.

**(३)** अर्जदार, तपासणी समितीला छाननी करण्यासाठी जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा मूळ प्रमाणपत्रे आणि दस्तऐवज सादर करील.

१८. नियम १२ मध्ये तपासणी समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती नमूद केली आहे. त्यात चौकशी करण्यासाठी प्रकरण दक्षता पथकाकडे पाठवण्याची तरतूद आहे. नियम १२ खालीलप्रमाणे आहे :-

**"१२. तपासणी समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती** ---

(१) अर्ज मिळाल्यानंतर तपासणी समिती किंवा तिने प्राधिकृत केलेली व्यक्ती अर्जाची, अर्जातील माहितीची आणि दस्तऐवजांची छाननी करील आणि अर्ज मिळाल्याची पोच देईल.सदस्य सचिव, तपासणीसाठी मिळालेल्या अर्जाची अध्यक्षाने विहित केलेल्या नोंदवहीत नोंद घेईल.

**(२) अर्जदाराने सादर केलेल्या लेखी पुराव्याबाबत तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, तपासणी समिती ते अर्ज शालेय, गृह आणि इतर चौकशी करण्यासाठी दक्षता पथकाकडे पाठविल.**

**(३) दक्षता अधिकारी, अर्जदाराच्या निवासाच्या स्थानिक ठिकाणी आणि तो ज्या ठिकाणी राहात असेल त्या मूळ ठिकाणी आणि नेहमीच्या राहाण्याच्या ठिकाणी किंवा स्थलांतराबाबतीत, तो राहात असलेल्या ज्या मूळ ठिकाणाहून त्याने स्थलांतर केले असेल अशा नगरात किंवा शहरात किंवा गावाच्या ठिकाणी जाईल.**

**(४) दक्षता अधिकारी, अर्जदार किंवा त्याचे आईवडील किंवा यथास्थिती, त्याचे पालक यांच्याकडून दावा केलेल्या सामाजिक दर्जाची व्यक्तिशः तपासणी करील आणि सर्व वस्तुस्थितीची माहिती गोळा करील.**

**(५) दक्षता पथक, अर्जदाराच्या जमातीची तपासणी करण्यासाठी अर्जदाराच्या आई-वडिलांची किंवा पालकांची किंवा अर्जदाराचीसुध्दा तपासणी करील.**

(६) चौकशी पूर्ण झाल्यानंतर, दक्षता पथका त्यांचा अहवाल तपासणी समितीला सादर करील, तपासणी समिती, दक्षता पथकाने सादर केलेल्या अहवालाची छाननी करील.

(७) दक्षता पथकाचा अहवाल अर्जदाराच्या बाजूने असेल आणि अर्जदाराचा दावा खरा व सत्य असल्याबाबत तपासणी समितीची खात्री पटल्यास, तपासणी समिती वैधता प्रमाणपत्र देऊ शकेल.वैधता प्रमाणपत्र नमुना “ ग ” मध्ये देण्यात येईल.

(८) दक्षता पथकाचा अहवाल आणि इतर उपलब्ध दस्तऐवजांच्या आधारावर अर्जदाराने केलेल्या दाव्याबाबत तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, समिती, अर्जदारास कारणे दाखवा नोटीस देईल आणि दक्षता अधिकाऱ्याच्या अहवालाची एक प्रतही पोच देय नोंदणी डाकेने पाठविल.आवश्यक असेल तर संबंधित विभाग प्रमुखालाही एक प्रत पाठविल.नोटिशीमध्ये दर्शविण्यात येईल की, अभिवेदन किंवा उत्तर कोणतेही असल्यास ते नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत द्यावे आणि कोणत्याहीबाबतीत, हा कालावधी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांहून अधिक असणार नाही.अर्जदाराने, कालमर्यादा स्थगित करण्यासाठी किंवा ती वाढविण्यासाठी विनंती केल्यास अशा प्रकरणी त्याला वाजवी कालमर्यादा देण्यात येईल.

(९) ( ए ) व्यक्तिश: म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दाव्याच्या खरेपणाविषयी तपासणी समितीचे समाधान झाल्यास नमुना- " ग " मध्ये वैधता प्रमाणपत्र देण्यात येईल.

(बी) व्यक्तिश: म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दाव्याच्या खरेपणाविषयी आणि अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या अचूकतेविषयी तपासणी समितीचे समाधान झाले नाही तर, ती प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा आदेश काढील आणि प्रमाणपत्र जप्त करील आणि हे, समुचित प्राधिकरणास नोंदवहीत आवश्यक त्या नोंदी घेण्यासाठी आणि आवश्यक ती पुढील कारवाई करण्यासाठी कळविल. त्यानंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रावर "रद्द आणि जप्त करण्यात आले " असा शिक्का मारण्यात येईल.

१९. नियम १२ चे उपनियम (२) स्पष्टपणे उपबंधित करते की, जर पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याबाबत समाधानी नसेल तरच ती शालेय चौकशी, गृह चौकशी व इतर चौकशी करण्यासाठी अर्ज दक्षता पथकाकडे पाठवेल. त्यामुळे, प्रत्येक प्रकरणात, नित्याची बाब म्हणून, पडताळणी समिती चौकशी करण्यासाठी अर्ज यांत्रिकपणे दक्षता पथकाकडे पाठवू शकत नाही. जेव्हा नियम १२ च्या उप-नियम (२) ने निर्धारित करून दिले आहे की अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांबाबत पडताळणी समितीचे समाधानी झाले नसेल तरच प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविण्यात यावे, तेव्हा असे समजावे की पडताळणी समितीस अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांबाबत तिचे समाधान का झाले नाही याची संक्षिप्त कारणे नोंद करणारा आदेश पारित करणे आवश्यक आहे. प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविण्यापूर्वी, अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यांवर बुद्धीचा वापर करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे बुद्धीचा वापर पडताळणी समितीच्या आदेशात प्रतिबिंबित व्हायलाच पाहिजे.

२०. कोणत्या प्रकरणांमध्ये पडताळणी समितीने प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविणे आवश्यक आहे हे परिपूर्णरीत्या नमूद करणे शक्य नाही. **कुमारी माधुरी पाटील**[१] च्या प्रकरणात अनेक चाचण्यांपैकी एक चाचणी नमूद केली आहे. त्यात असे नमूद केले आहे की अर्जदाराची आणि त्याच्या पूर्वजांची जात दर्शविणाऱ्या संविधानपूर्व काळातील कागदपत्रांना सर्वाधिक पुरावा मूल्य मिळाले आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या अर्जदारास तो आदिवासी समाजाचा असल्याचे दर्शविणारी संविधानपूर्व काळातील अस्सल व खरे कागदपत्रे सादर करणे शक्य असल्यास त्याचा दावा नाकारण्याचे कोणतेही कारण नाही कारण १९५० च्या

पूर्वी, अनुसूचित जमातीच्या आदेशात समाविष्ट असलेल्या जमातींना कोणतेही आरक्षण देण्यात आले नव्हते. अशा परिस्थितीत, दक्षता पथकाकडे प्रकरण पाठविणे अजिबात आवश्यक नाही.

२१. दिवाणी अपील क्रमांक २०२२ च्या २५०२ (**शिल्पा विष्णू ठाकूर चे प्रकरण**[२]) मधील आक्षेपित न्यायनिर्णयात, मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने अशी नोंद केली आहे की 'ठाकूर' आडनाव असलेले लोक हे प्रगत जाती तसेच विविध मागासलेल्या जाती या दोन्ही जातींमध्ये येतात. त्यामुळे, पूर्ण न्यायपीठ हे म्हणण्यामध्ये बरोबर असू शकते की, प्रत्येक प्रकरणात, केवळ 'ठाकूर' या आडनावाच्या आधारावर, पडताळणी समिती द्वारे असा निष्कर्ष काढू शकत नाही की अर्जदार हा महाराष्ट्र यादीतील ४४ क्रमांकाच्या नोंदीमध्ये अधिसूचित केलेल्या 'ठाकूर' या अनुसूचित जमातीचा आहे. तथापि, आपण हे लक्षात घेतलेच पाहिजे की 'ठाकूर' आडनाव असलेली व्यक्ती असल्यास, जमिनीच्या नोंदींमध्ये, शालेय किंवा महाविद्यालयीन नोंदीमध्ये किंवा अर्जदार किंवा त्याच्या पूर्वजांशी संबंधित कोणत्याही अधिकृत नोंदींमध्ये जमात किंवा अनुसूचित जमात म्हणून जातीच्या नावाच्या स्वरूपात पुरावा असू शकतो. केवळ 'ठाकूर' आडनाव असलेली व्यक्ती देखील प्रगत जातीची असू शकते या आधारावर, प्रत्येक प्रकरणात, पडताळणी समितीने प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविणे आवश्यक नाही. हे सर्व जात पडताळणी समितीसमोर सादर केलेल्या कागदपत्रांच्या स्वरूपावर आणि कागदपत्रांच्या पुरावा मूल्यावर अवलंबून असते. त्यामुळे, जेव्हा जेव्हा 'ठाकूर' अनुसूचित जमातीच्या संदर्भात जातीच्या दाव्याचा विचार केला जातो तेव्हा जात पडताळणी समितीने प्रत्येक प्रकरणात आप्तभाव चाचणीसह चौकशी करण्यासाठी प्रकरण यांत्रिकपणे दक्षता पथकाकडे पाठवू नये. जर पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्याविषयी समाधानी नसेल तरच प्रकरण दक्षता पथकाला पाठवता येऊ शकते.

२२. आम्ही सुद्धा आणखी एक परिस्थिती, जी अनेक प्रकरणांमध्ये आढळून आली, ती नमूद करू शकतो. ही अशी प्रकरणे आहेत ज्यात अर्जदार त्याच्या रक्तसंबंध असलेल्या नातेवाईकांना दिल्या गेलेल्या जात वैधतेच्या प्रमाणपत्रांवर अवलंबून असतो. अर्थात, असे वैधता प्रमाणपत्र एकतर **कुमारी माधुरी पाटील यांचे प्रकरण**[१] मध्ये दिल्या गेलेल्या निर्देशांनुसार गठित केलेल्या पडताळणी समितीने दिलेले असले पाहिजे किंवा २००० च्या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांनुसार गठित केलेल्या पडताळणी समितीने दिलेले

असले पाहिजे. अशा प्रकरणात, प्रथमतः, पडताळणी समितीने प्रमाणपत्र खरे आहे की नाही हे खात्री करून घेतले पाहिजे. दुसरे असे की, पडताळणी समितीला हे ठरवावे लागेल की, अर्जदाराने तो ज्यावर विसंबून आहे ते वैधता प्रमाणपत्र ज्या व्यक्तीला देण्यात आले आहे ती व्यक्ती त्याची रक्तसंबंध नातेवाईक आहे हे सिद्ध केले आहे का. त्यासाठी, अर्जदारास ज्या व्यक्तीला वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या व्यक्तीशी त्याचे नेमके व निश्चित संबंध सिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच, योग्य चौकशी करून आणि रीतसर कार्यपध्दतीचे पालन करून संबंधित पडताळणी समितीद्वारा अर्जदाराच्या रक्तसंबंध नातेवाईकाला वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे की नाही याची पडताळणी समितीद्वारे चौकशी करावी लागेल. त्यामुळे, जर पडताळणी समितीने **कुमारी माधुरी पाटील**[१] च्या प्रकरणात दिलेल्या निर्णयाच्या अनुसार पूर्वकल्पना केलेले वैधता प्रमाणपत्र दिले असेल, तर उक्त निर्णयाद्वारे पूर्वकल्पना केलेली चौकशी करण्यात आली आहे की नाही हे तपासले जाईल. ज्या प्रमाणपत्राचा आधार घेतला ते प्रमाणपत्र जर २००० चा अधिनियम अंमलात आल्यानंतर देण्यात आले असेल तर पडताळणी समितीला ह्याची खात्री करावी लागेल की संबंधित पडताळणी समितीने त्यात नमूद केलेल्या कार्यपद्धतीचे तसेच यथोस्थिती, अनुसूचित जमातीसंबंधी नियमांमध्ये किंवा अनुसूचित जातीसंबंधी नियमांमध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण केले होते की नाही. या पडताळणीसाठी, तपासणी समिती अर्जदाराच्या रक्तसंबंध नातेवाईकाला ज्या संबंधित जात पडताळणी समितीने वैधता प्रमाणपत्र दिले आहे त्या संबंधित जात पडताळणी समितीच्या अभिलेखाची मागणी करून कलम ९(डी) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करू शकते. जर अभिलेख नष्ट करण्यात आला असेल तर तपासणी समिती, जात पडताळणी समितीच्या निर्णयाच्या आधारे ज्याद्वारे अर्जदाराच्या रक्तसंबंध नातेवाईकाला जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे त्या आधारावर योग्य चौकशी करण्यात आलेली आहे की नाही ह्याची खात्री करू शकते. जर हे सिद्ध झाले की वैधता प्रमाणपत्र योग्य चौकशी न करता किंवा कारणे नमूद न करता देण्यात आले आहे, तर स्पष्टपणे, जात पडताळणी समिती केवळ रक्तसंबंध नातेवाइकांच्या अशा वैधता प्रमाणपत्राच्या आधारे जाति प्रमाणपत्र वैध ठरवू शकत नाही.

२३. प्रस्तुत प्रकरणात, पडताळणी समितीचे असे समाधान होऊ शकते की अर्जदार ज्या जात वैधता प्रमाणपत्रावर विसंबून होता ते जात वैधता प्रमाणपत्र हे कायदेशीर चौकशी

केल्यानंतर देण्यात आले आहे. परंतु जर पडताळणी समितीचे असे मत असेल की अभिलेखावर दाखल जाति वैधता प्रमाणपत्र ज्या व्यक्तीला दिले गेले आहे ती व्यक्ती अनुसूचित जमातीसंबंधी नियमांचे नियम १२, उपनियम (२) नुसार त्याचा रक्तसंबंध नातेवाईक आहे हे अर्जदाराने स्पष्टपणे सिद्ध केलेले नाही, तर जात पडताळणी समितीला प्रकरण दक्षता पथकामार्फत चौकशी करण्यासाठी पाठवावे लागेल. अशा प्रकरणात, ज्या व्यक्तीच्या नावे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे, त्या व्यक्तीशी अर्जदाराने दावा केलेल्या नातेसंबंधाशी मर्यादित चौकशी करण्यासाठी पडताळणी समितीद्वारे दक्षता पथकाला निर्देश दिले जाऊ शकतात. जर, दक्षता पथकाच्या अहवालाच्या आधारे, पडताळणी समितीचे समाधान झाले असेल की ज्या व्यक्तीच्या नावे जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे ती व्यक्ती अर्जदाराचा रक्तसंबंध नातेवाईक आहे आणि वैधता प्रमाणपत्र देण्यापूर्वी कायदेशीर चौकशी करण्यात आली आहे तर पडताळणी समितीला, जरी अर्जदार आप्तभाव चाचणी पूर्ण करत नसेल तरीही वैधता प्रमाणपत्र द्यावे लागेल. उदाहरणार्थ, अर्जदाराच्या वडिलांना किंवा आजोबांना, कायद्यानुसार कायदेशीर चौकशी केल्यानंतर जाति वैधता प्रमाणपत्र देण्यात आले आहे हे सिद्ध झाल्यास, अर्जदाराचे आजोबा किंवा स्थिती विशेषानुसार, अर्जदाराचे वडील अनुसूचित जमातीचे आहेत परंतु अर्जदार अनुसूचित जमातीचा नाही असे जात पडताळणी समिती निर्णय देऊ शकत नाही. अर्जदाराने प्रतिवाद केल्यानुसार नातेसंबंध जर सिद्ध न झाल्यास, तरच, अर्जदाराने सादर केलेला इतर पुरावा आणि आप्तभाव चाचणीचा निकाल पडताळणी समिती विचारात घेऊ शकते.

२४. अनुसूचित जमातींसंबंधी नियमांच्या नियम १२, उप-नियम (७) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, दक्षता पथकाचा अहवाल निर्णायक नाही. दक्षता पथकाच्या अहवालाच्या आणि अभिलेखावर असलेल्या इतर पुराव्यांच्या आधारे जर पडताळणी समिती अशा निष्कर्षाप्रत पोहोचल्यास की जातीचा दावा खरा आहे, तर जातीचे वैधता प्रमाणपत्र देता येऊ शकते. केवळ दक्षता पथकाचा अहवाल अर्जदाराच्या बाजूने आहे या कारणास्तव केवळ, बुद्धीचा वापर केल्याशिवाय यांत्रिकपणे वैधता प्रमाणपत्र दिले जाऊ शकत नाही. जर दक्षता पथकाचा अहवाल अर्जदाराच्या विरोधात असेल, तर त्याचा जातीचा दावा अर्जदाराला अहवालाची प्रत दिल्याशिवाय आणि अहवालावर आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय त्याला केवळ दक्षता पथकाच्या अहवालाच्या आधारे नाकारला जाऊ शकत

नाही. अहवालावर निवेदन सादर करण्याची अर्जदाराला संधी दिल्यानंतर, पडताळणी समिती जातीचा दावा नाकारू शकते. प्रस्तूत प्रकरणात, पडताळणी समिती जातीचा दावा खरा आहे असा निष्कर्ष देखील नोंदवू शकते. हे सर्व प्रत्येक प्रकरणाच्या तथ्यांवर अवलंबून आहे.

**आप्तभाव चाचणी**

२५. आता, आपण आप्तभाव चाचणीसंबंधीच्या वादविवादाकडे येऊ. **कुमारी माधुरी पाटील**[१] यांच्या प्रकरणामधील निर्णयाच्या परिच्छेद १३ च्या खंड (५) मध्ये असा निर्णय दिला आहे की अनुसूचित जमातींच्या प्रकरणात, दक्षता पथक विशिष्ट जाती किंवा जमातीच्या बाबतीत विशिष्ट मानवशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय विशेष लक्षणे वैशिष्ट्ये, देवता, विधी, प्रथा, विवाह पद्धती, मृत्यू-पश्चात विधी, मृतदेह पुरण्याच्या पद्धती इत्यादींसंबंधात अहवाल सादर करेल. विशिष्ट अनुसूचित जमातीच्या बाबतीत दक्षता पथकाद्वारे निश्चित करून घेतलेले असे तपशील आप्तभाव चाचणी घेण्यासाठी अतिशय निगडित आहेत. दक्षता पथक, आप्तभाव चाचणी घेतांना, त्या विशिष्ट अनुसूचित जमातीच्या बाबतीत, समाजाच्या देवता, चालीरीती, विधी, विवाह पद्धती, मृत्यू-पश्चात विधी, इत्यादींविषयी अर्जदाराच्या ज्ञानाची पडताळणी करते. तिच्या प्रत्यक्ष स्वरूपानुसार, अशी आप्तभाव चाचणी कधीही निर्णायक असू शकत नाही. जर अर्जदार हा त्याच्या कुटुंबियांसोबत अनेक दशकांपासून मोठ्या शहरी भागात राहिलेला आहे किंवा त्याचे कुटुंब अनेक दशकांपासून अशा शहरी भागात राहिलेले आहे, तर अर्जदाराला पूर्वी सांगितलेल्या तथ्यांची माहिती नसू शकते. हे खरे आहे की दक्षता पथक अर्जदाराच्या पालकांनाही प्रश्नसुद्धा विचारू शकतात. परंतु, प्रस्तूत प्रकरणात, पालकांना सुद्धा ज्ञान नसेल कारण ते अनेक वर्षांपासून मोठ्या शहरी भागात राहत आहेत. दुसरीकडे, एखादी व्यक्ती विशिष्ट जमातीची नसेल, परंतु त्याला पूर्वोक्त पैलूंबद्दल चांगले ज्ञान असू शकते. त्यामुळे, ज्येष्ठ विद्वान अधिवक्ता श्री. शेखर नाफडे यांचा युक्तिवाद बरोबर आहे जेव्हा त्यांनी सादर केले की, आप्तभाव चाचणी रासायनिक चाचणी (लिटमस चाचणी) लागू केली जाऊ शकत नाही. आम्ही येथे पुन्हा नोंद घेऊ शकतो की आप्तभाव चाचणी घेण्याचा प्रश्न केवळ त्याच प्रकरणांमध्ये उद्भवतो जेथे पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या महत्वाच्या पुराव्यांबाबत समाधानी नसेल.

२६. असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, अनुसूचित जातीसंबंधी नियमांचा

संबंध असेल तितपत, नियम १३ चे खंड (डी) हे  दक्षता पथकाद्वारे आप्तभाव चाचणी घेण्याबाबत विनिर्देशपुर्वक उपबंधित करते आणि अनुसूचित जमातीसंबंधी नियमांमध्ये अशी कोणतीही समान बाबीची तरतूद नाही. अनुसूचित जमातीसंबंधी नियमांचे नियम १२, उपनियम (४) हे दक्षता अधिकाऱ्याला अर्जदाराच्या किंवा यथास्थिती, त्याच्या पालकांच्या सामाजिक स्थितीबाबत तथ्ये गोळा करण्याचे व्यादिष्ट केले आहे त्यामुळे आम्ही हे सादर निवेदन स्वीकारण्यास असमर्थ आहोत. त्यामुळे, उप-नियम (५) अर्जदाराची  आणि त्याच्या पालकांची  तपासणी करण्याकरिता उपबंधित करतो. प्रस्तूत  प्रकरणात, अनुसूचित जमातीसंबंधी नियमांच्या नियम १२, उप-नियम (४) ने योजल्याप्रमाणे सामाजिक  स्थितीच्या पडताळणीसाठी दक्षता पथकाद्वारा  आप्तभाव  चाचणीचा अवलंब केला जाऊ शकतो.

<u>**जाति प्रमाणपत्र पडताळणी समिती न्यायिकवत  कार्य करते  किंवा नाही**</u>

२७. **विजकुमार**[३] आणि **आनंद**[४] या प्रकरणांमधील निर्णयांची आम्ही पाहणी करण्यापूर्वी,  पडताळणी समिती ही न्यायिकवत प्राधिकारी नाही, असा हस्तक्षेप करणाऱ्यांपैकी एकाने केलेला युक्तिवाद विचारात घेणे गरजेचे आहे. सदरचे सादर निवेदन **दयाराम**[९] च्या प्रकरणामधील ह्या न्यायालयाच्या समकक्ष न्यायपीठाच्या निर्णयावर आधारलेले आहे. **दयाराम**[९] च्या प्रकरणामधील निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये असा निर्णय दिला आहे की :

> "३५. पडताळणी समिती ही न्यायालय किंवा न्यायाधिकरण यासारखे अभिनिर्णय करणारे प्राधिकरण नाही, तर ती एक प्रशासकीय संस्था आहे जी तथ्यांची पडताळणी करते, (जातीच्या दर्जाची) विशिष्ट दाव्याची चौकशी करते आणि दावा केलेला जाती/आदिवासी दर्जा बरोबर आहे की नाही हे निश्चित करते. प्रशासकीय प्राधिकाऱ्यांच्या  कोणत्याही इतर निर्णयांप्रमाणेच, पडताळणी समितीचे आदेश देखील भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २६ खाली कार्यवाहीत आव्हानीत करण्यासाठी खुले आहेत. अपीले आणि पुढील अपीलांच्या तरतुदींसह दिवाणी दाव्यांना परवानगी देणे ह्या योजनेचे प्रत्यक्ष प्रयोजनच विफल करेल आणि या न्यायालयाला ज्या वाईट गोष्टींचे उच्चाटन करायला हवे  होते त्याच वाईट गोष्टींना  प्रोत्साहन मिळेल. **या न्यायालयाला असे आढळून आले की अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीमध्ये मोडतो असा खोटा दावा करणाऱ्या उमेदवारांनी  अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी आरक्षित  मोठ्या प्रमाणात जागा किंवा पदे हिरावून घेतली, त्यामुळे  या न्यायालयाने,**

**अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या दर्जाबाबत खोट्या दाव्यांची योग्यरित्या पडताळणी करण्यासाठी कोणतीही संविधी किंवा कायदेशीर चौकटीच्या अभावी, शीघ्र, प्रभावी आणि गुणकारी उपाययोजनेची तरतूद करण्यासाठी अशा पडताळणी समित्या गठीत करण्याचे निर्देश दिले. माधुरी पाटील प्रकरणात [(१९९४) ६ एससीसी २४१ : १९९४ एससीसी (एल अँड एस) १३४९ : (१९९४) २८ एटीसी २५९] तरतूद केलेली ही संपूर्ण योजना अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती म्हणून जातीच्या दाव्यांची पडताळणी करण्याच्या आणि** जाति प्रमाणपत्र देण्यासंबंधी किंवा अशा जाति प्रमाणपत्रांवर विसंबून, आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी, आधीच प्राप्त केलेल्या **जाति प्रमाणपत्रांच्या पडताळणी संबंधी योग्य विधिविधान संबंधित विधिमंडळ जोपर्यंत तयार करित नाहीत तोपर्यंत केवळ सुरु राहील .**

(यावर भर देण्यात आला आहे)

२८. आम्ही इथे याची नोंद घेतलीच पाहिजे की हे न्यायालय, मध्य प्रदेश राज्यातून उद्भवलेल्या एका प्रकरणात उक्त निर्णय हाताळत होते, जिथे **कुमारी माधुरी पाटीलच्या प्रकरण**[१] मध्ये समाविष्ट असलेल्या विषयाबाबत कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. त्यामुळे सदर निर्णयामध्ये नोंदविण्यात आलेली निरीक्षणे, **कुमारी माधुरी पाटील**[१] च्या प्रकरणातील निर्णयांतर्गत स्थापन करण्याचे आदेश देण्यात आलेल्या पडताळणी समितीच्या अधिकारांच्या संदर्भात आहेत. **दयाराम**[९] आणि **जय चित्रा**[१०] च्या प्रकरणांमध्ये या न्यायालयाने, अधिनियम, २००० किंवा इतर कोणत्याही राज्याला लागू असलेले तत्सम कायदे हाताळलेले नाहीत. अधिनियम, २००० तसेच त्याखाली तयार केलेल्या अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जातीच्या नियमांचे संयुक्त वाचन केल्यावर, असा निष्कर्ष काढणे अशक्य आहे की, पडताळणी समिती केवळ प्रशासकीय कार्ये पार पाडते. अधिनियम, २००० च्या अंतर्गत पडताळणी समिती कडे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अंतर्गत दिवाणी न्यायालयाचे विविध अधिकार सोपविण्यात आले आहेत. या अधिकारांमध्ये, कोणत्याही साक्षीदाराला हजर राहण्यास भाग पाडणे, शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे, साक्षीदारांची किंवा कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे, इत्यादी अधिकार समाविष्ट आहेत. अधिनियम, २००० ची योजना आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती हे दोन्ही नियम उपबंधित करते की पडताळणी समिती अर्जदाराच्या जातीच्या दाव्याची चौकशी करेल, आवश्यक

असल्यास, अर्जदाराची शपथेवर तपासणी केल्यानंतर, साक्षीदारांचे पुरावे नोंदवतील आणि कागदपत्रे आणि अभिलेख इत्यादी मागवतील. पडताळणी समितीकडून असे अपेक्षित आहे की त्यांनी जात वैधता प्रमाणपत्रे देण्यात येण्याची विनंती मंजूर करण्याची आणि नाकारण्याची कारणे नोंदवावी. अशा प्रकारे, पडताळणी समितीकडे न्यायिकवत प्राधिकरणाचे सर्व अधिकार आहेत.

<u>विजकुमार आणि आनंद यांच्या प्रकरणांमध्ये देण्यात आलेले निर्णय</u>

२९. आता आम्ही **विजकुमार**[३] च्या प्रकरणामध्ये देण्यात आलेल्या निर्णयाकडे येतो. **विजकुमार**[३] च्या प्रकरणामधील निर्णयाचे अवलोकन केल्यास, असे दिसून येते की सन्माननीय द्विसदस्यीय न्यायाधीशांच्या न्यायपीठाने महाराष्ट्र राज्यातून उद्भवणाऱ्या जमातीच्या दाव्याचा मुद्दा हाताळला. सदर निर्णयाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास, असे दिसून येते की सदर निर्णयामध्ये अनुसूचित जमातीसंबंधी नियमांचा संदर्भ देखील नाही. न्यायालयाचे लक्ष नियम १२, उप-नियम (२) कडे वेधल्या गेले नाही, जे विहित करते की, पडताळणी समिती जर अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यांबाबत समाधानी नसेल तरच केवळ प्रकरण पथकाकडे पाठवले जाऊ शकते. अधिनियम, २००० च्या तरतुदींचा तसेच अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीसंबंधी नियमांचा संदर्भ न घेता, **विजकुमारच्या प्रकरणा**[३] तील परिच्छेद ९, मध्ये असा निर्णय दिला आहे कीः -

> "९. पक्षकारांच्या विद्वान काऊन्सलचे म्हणणे ऐकल्यानंतर, आमचे असे ठाम मत आहे की अपीलकर्त्याच्या वतीने मांडण्यात आलेल्या विवादांमध्ये क्वचितच काही गुणवत्ता आहे. दक्षता अधिकाऱ्याने तसेच पडताळणी समितीने आप्तभाव चाचणी पूर्ण केली होती. प्रमाणपत्र वास्तविक आणि कायदेशीर हया दोन टप्प्यांवर, प्रथमतः, दिल्या जाण्याच्या टप्प्यावर आणि दुसरे, पडताळणीच्या टप्प्यावर, योग्य असल्याचे सिद्ध झाल्यानंतरच ते विधिग्राह्य करावयास पाहिजे. जर ते यापैकी कोणत्याही टप्प्यावर आप्तभाव चाचणीमध्ये अयशस्वी ठरले तर प्रमाणपत्राची वैधता कायम राहणार नाही."

त्यामुळे, २००० चा अधिनियम आणि नियमांचा विचार केला गेला नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता, **विजकुमार**[३] च्या प्रकरणातील निर्णय हा, प्रत्येक प्रकरणात,

पडताळणी समितीला प्रकरण दक्षता पथकाकडे पाठवून आप्तभाव चाचणीचा अवलंब करणे आवश्यक आहे या प्रतिपादनासाठी निश्चितच बंधनकारक पूर्वोदाहरण नाही.

३०. **आनंद**[४] च्या प्रकरणातील निर्णय परिच्छेद ४ आणि ५ यामध्ये, अनुसूचित जमातीसंबंधी नियमांच्या नियम ११ आणि नियम १२(२) कडे विनिर्दिष्टपणे निर्देश करतात. परिच्छेद २२ मध्ये, या न्यायालयाने असे मत व्यक्त केले आहे की :

"**२२**. वर नमूद उतारा घेतलेल्या परिच्छेदातून हे अभिव्यक्त होते की जातीच्या दाव्याची सत्यता केवळ दाव्याच्या समर्थनार्थ सादर केलेल्या कागदपत्रांच्या सखोल तपासणीवरच विचारात घ्यायची नव्हे तर अर्जदाराच्या आप्तभाव चाचणीवरही, ज्यात मानवशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय विशेष लक्षणे, इत्यादी वैशिष्ट्याचा समावेश असेल, विचारात घ्यायची आहे. तथापि, एखादा निर्विवाद नियम, जो जातीचा दावा तपासण्यासाठी यांत्रिकपणे लागू करता येईल, विहित करणे शक्य नाही तसेच इष्टही नाही. तरीसुद्धा, आम्हाला असे वाटते की जातीचे दावे हाताळतांना खालील व्यापक मापदंड लक्षात ठेवता येईल :

(*i*) कागदोपत्री पुरावा हाताळतांना, स्वातंत्र्यपूर्व काळातील कागदपत्रांवर अधिक भरवसा ठेवता येईल कारण स्वातंत्र्योत्तर काळातील कागदपत्रांच्या तुलनेत ते जातीच्या दर्जाच्या घोषणेस उच्च श्रेणीचा पुरावा मूल्य प्रदान करतात. जर अर्जदार हा पहिल्या पिढीतील शाळेत जाणारा असेल तर कोणताही लेखी पुरावा उपलब्ध होणे कठीण होते, परंतु त्यामुळे वस्तुसिद्ध त्याचा दावा फेटाळण्याची गरज नाही. वस्तुतः, तो शाळेत जाणारा पहिल्या पिढीतील आहे ही केवळ वस्तुस्थिती असेल तर, अर्जदारास संशयाचा फायदा देण्यात यावा. ह्याची भर घालण्याची गरज नाही की एखाद्या दस्तऐवजाच्या विश्वासार्हतेबद्दल शंका असल्यास, त्याचा खरेपणा मौखिक पुराव्याच्या आधारे तपासावा लागेल, ज्यासाठी अर्जदाराला संधी द्यावयास हवी;

(*ii*) **आप्तभाव चाचणी जी अनुसूचित जमातीशी असलेल्या मानववंशशास्त्रीय संबंधांवर लक्ष केंद्रित करते, लागू करताना सावधगिरीचा दृष्टिकोन अवलंबास हवा. काही दशकांपूर्वी, जेव्हा जमाती त्यांच्या सभोवताली होणाऱ्या सांस्कृतिक विकासापासून काही प्रमाणात मुक्त होत्या तेव्हा आप्तभाव चाचणी एक निश्चायक घटक म्हणून काम करू शकत होती. तथापि, स्थलांत आधुनिकीकरण आणि इतर**

**जनसमाजासोबत संपर्क आल्याने, ह्या जनसमाजाचा नवीन विशेष लक्षणे, जी जमातीच्या पारंपारिक वैशिष्ट्यांशी मूलतः जुळत नाही, अशी नविन विशेष लक्षणे विकसित करण्याकडे आणि त्यांचा अवलंब करण्याकडे कल असतो. त्यामुळे, आप्तभाव चाचणी ही अर्जदाराचा अनुसूचित जमातीशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी एक 'रासायनिक चाचणी' (लिटमस चाचणी) म्हणून मानता येणार नाही. तरीसुद्धा, अर्जदाराद्वारे केलेला दावा की तो अनुसूचित जमातीचा एक भाग आहे आणि त्या जमातीला देण्यात आलेल्या लाभासाठी तो पात्र आहे, त्याची सध्याची विशेष लक्षणे ही त्याच्या जमातीच्या विशिष्ट मानवशास्त्रीय आणि मानववंशशास्त्रीय विशेष लक्षणे, देवता, विधी, चालीरीती, विवाहपद्धत, मृत्यू-पश्चात विधी, मृतदेह पुरण्याच्या विधी, इत्यादींशी जुळत नाहीत या कारणास्तव प्रत्यक्ष दुर्लक्ष केल्या जाऊ शकत नाही. त्यामुळे आप्तभाव चाचणीचा वापर कागदोपत्री पुराव्यास पुष्टी देण्यासाठी केला जाऊ शकतो आणि दावा फेटाळण्यासाठी एकमेव निकष म्हणून नसावा.**

(भर देण्यात आला आहे)

आप्तभाव चाचणी नेहमीच अनिवार्य आणि/किंवा निर्णायक नसते या निष्कर्षाप्रत येण्यासाठी आम्ही यापूर्वी अशाच कारणांची नोंद केली आहे.

३१. **आनंद**[४] च्या प्रकरणामधील निर्णयाचा परिच्छेद १९ ह्या स्थितीचा पुनरुच्चार करतो की जेव्हा पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यांबाबत समाधानी नसेल तेव्हाच दक्षता पथकाद्वारा चौकशी करण्याचे आदेश दिले जाऊ शकतात. या पैलूवर, आम्ही **जिल्हाधिकारी, सातारा**[६] यांच्या प्रकरणातील ह्या न्यायालयाच्या निर्णयाचा उपयुक्त संदर्भ देऊ शकतो. हा निर्णय आमच्यापैकी एकाने (संजय किशन कौल, न्यायमूर्ति) लिहिला आहे, जो अनुसूचित जमातीसंबंधी नियमांचे आणि विशेषतः नियम १२ चे सखोल विश्लेषण करतो. परिच्छेद ९ मध्ये, ह्या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे :

"९ ...............................................................

उपरोक्त नियमांचे वाचन केल्यास असे दिसून येते की माधुरी पाटीलच्या प्रकरणाखाली

[माधुरी पाटील - विरुद्ध - आयुक्त, आदिवासी विकास विभाग, (१९९४) ६ एससीसी २४१ : १९९४ एससीसी (एल अँड एस) १३४९] **दृष्टीसमोर ठेवलेल्या भूमिकेच्या तुलनेत दक्षता पथकाची भूमिका ही, ज्याअर्थी प्रत्येक प्रकरणात पडताळणी समितीस सहाय्य पुरवायचे नव्हते तर केवळ जर पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या लेखी पुराव्याशी समाधानी नसेल तर, एवढेच मर्यादित होती."**

(यावर भर देण्यात आला आहे)

३२. त्यामुळे, याआधी निरीक्षण केल्याप्रमाणे, **विजकुमार**[३] च्या प्रकरणातील निर्णय हा जातीच्या दाव्याच्या पडताळणीच्या प्रत्येक प्रकरणात, जात पडताळणी समितीला प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविणे अनिवार्य आहे असे वैध तत्व निर्धारित करून देणारे बंधनकारक पूर्वोदाहरण म्हणून वाचता येऊ शकत नाही. अनुसूचित जमातीसंबंधी नियमांच्या योजनेखाली असल्याप्रमाणे, दक्षता पथकाने आप्तभाव चाचणी घ्यावयाची आहे, ह्याचा अर्थ असा होतो की जेव्हा दक्षता पथकाकडे प्रकरण पाठविणे आवश्यक आहे असे प्रकरण तयार होईल तेव्हाच आप्तभाव चाचणी करण्याचा प्रश्न उद्भवेल. जर पडताळणी समिती, चौकशी केल्यानंतर, प्रकरण दक्षता पथकाकडे न पाठवता, अभिलेखावर दाखल केलेल्या पुराव्याबाबत समाधानी असेल तर जात पडताळणी समितीला जात प्रमाणपत्राला वैधता देणे अनिवार्य आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे, प्रस्तूत प्रकरणात, पडताळणी समिती दक्षता पथकाद्वारा मर्यादित चौकशी करण्याचे आदेश देऊ शकते. उदाहरणार्थ, जर एखादा अर्जदार त्याच्या रक्तसंबंध नातेवाईकाला दिल्या गेलेल्या जात वैधता प्रमाणपत्रावर विसंबून असेल आणि पडताळणी समितीला, रीतसर चौकशी केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या गेल्याचे आढळल्यानंतर, वादप्रतिवाद केलेल्या नातेसंबंधांबद्दल शंका आल्यास, ती दक्षता पथकाला केवळ नातेसंबंधांबद्दल चौकशी करण्याचे निर्देश देऊ शकते.

३३. आता आम्ही **शिल्पा विष्णू ठाकूरच्या प्रकरणातील**[२] आक्षेपीत न्यायनिर्णयाकडे येतो. पूर्ण न्यायपीठाने विचारात घेण्यासाठी तयार केलेले प्रश्न परिच्छेद ४ मध्ये आहेत, जे असे वाचते:

"(i ) एखाद्या व्यक्तीचा जातीचा दावा निश्चित करण्यामध्ये परमोच्च विचारार्ह बाब ही कागदोपत्री पुरावा किंवा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्याप्रमाणे, "मानवशास्त्रीय मूलबंध आणि मानववंशशास्त्रीय नातेसंबंध" असायला पाहिजे; आणि "निर्णायक

आप्तभाव चाचणी" ही अशा निर्णयासाठी निगडित आणि सुसंबद्ध आहे का?

(ii)(ए ) अशा प्रकरणांमध्ये जिथे एखाद्या विशिष्ट जातीत मोडत असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीने सादर केलेली कागदपत्रे आवश्यकतेची पूर्तता करत असल्यास, उदाहरणार्थ, 'ठाकूर' जातीच्या प्रकरणात, जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली/दाखल केलेली आणि विसंबून असलेली सर्व कागदपत्रे त्याची जात'ठाकूर' म्हणून दर्शवित असेल तर, 'निर्णायक आप्तभाव चाचणी' च्या संदर्भात जातीच्या दाव्याला विधिग्राह्यता न देता, जातीचा दावा विधिग्राह्य केला जावा की नाही?

(बी) अशा प्रकरणात जिथे विशिष्ट जातीच्या दाव्याच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी कोणतेही दस्तऐवज एखाद्या व्यक्तीच्या कब्ज्यात नसेल, तेथे जातीच्या दाव्याची 'निर्णायक आप्तभाव चाचणी' च्या आधारे पडताळणी केली जाऊ शकते का आणि वैधता प्रमाणपत्र दिले जाऊ शकते का?

(सी) जेथे एखादी व्यक्ती, जी विशिष्ट जातीमध्ये मोडत असल्याचा दावा करते, अशा व्यक्तीकडे त्याच्या बाजूने काही कागदपत्रे असतील आणि/किंवा निर्णायक आप्तभाव चाचणीची अंशतः पूर्तता करत असेल, तर दावा प्रमाणित करता येऊ शकतो का आणि उमेदवार त्याच्या जात प्रमाणपत्राच्या वैधतेसाठी हक्कदार आहे का?"*

३४. पूर्ण न्यायपीठाने काढलेले निष्कर्ष परिच्छेद ४० मध्ये नोंदविण्यात आले आहेत. परिच्छेद ४० च्या खंड (१) मध्ये, उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने असे नोंदविले आहे की, नियम १२(२) अंतर्गत, पडताळणी समितीला जर सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याबाबत तिचे समाधान झाले नसल्यास, शालेय चौकशी, गृह चौकशी आणि इतर चौकशी करण्यासाठी अर्ज दक्षता पथकाकडे पाठवावा लागतो. पूर्ण न्यायपीठ असे निर्धारित करत नाही की प्रत्येक प्रकरणात जिथे पडताळणी समिती अनुसूचित जमातीचे दावे हाताळत आहे तिथे प्रकरण दक्षता पथकाकडे सोपावयालाच पाहिजे. परिच्छेद ४० च्या खंड (२)(ए) मध्ये, पूर्ण न्यायपीठ असे नोंदविते की पडताळणी समितीने, संपूर्ण पुरावा, अर्जदाराने

आत्मभाव चाचणीची पूर्तता केली आहे की नाही याबाबतच्या प्रश्नासह, विचारात घेतलाच पाहिजे. या आधी मत व्यक्त केल्याप्रमाणे, पूर्वी निर्णय दिल्याप्रमाणे, जर प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविले तरच आप्तभाव चाचणीची मदत घेण्याचा प्रश्न उद्भवेल. वास्तविक, परिच्छेद ४० च्या खंड (बी) मध्ये, पूर्ण न्यायपीठाने असा निर्णय दिला आहे की जर एखाद्या अर्जदाराकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नसेल तरीही त्याचा वस्तुसिद्ध परिणाम जातीचा दावा विधिग्राह्य ठरणार नाही. याचे कारण असे की अशा प्रकरणात, नियम १२, उप-नियम (२) लागू होईल आणि दक्षता पथकाला चौकशी, आत्मभाव चाचणीसह करावी लागेल. अशा प्रकरणात देखील, **आनंदच्या प्रकरणातील**[४] परिच्छेद २० च्या खंड (२) मध्ये निर्णय दिल्याप्रमाणे आप्तभाव चाचणी दोहोंपैकी एका प्रकारे निर्णायक ठरणार नाही. त्याच परिच्छेदाच्या खंड (सी) मध्ये, उच्च न्यायालयाच्या पूर्ण न्यायपीठाने असाही निर्णय दिला आहे की अर्जदार, अभिलेखावरील पुराव्याच्या स्वरूपावर अवलंबून, आप्तभाव चाचणीची अंशतः पूर्तता करत असेल, तरीही पडताळणी समितीला दावा विधिग्राह्य करण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे, खंड (सी) देखील आप्तभाव चाचणी निर्णायक नाही अशा स्थितीवर पुढे जाते.

३५. आक्षेपित न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ४० चे संपूर्णतः वाचन केले असता, आम्ही असा निष्कर्ष काढू शकत नाही की पूर्ण न्यायपीठाद्वारा आप्तभाव चाचणीच्या निर्णायक स्वरूपाबद्दल निष्कर्ष नोंदविण्यात आलेला आहे. या निष्कर्षाचा अर्थ असा समजला जाऊ शकत नाही की प्रत्येक प्रकरणात दक्षता पथकाकडे प्रकरण पाठविणे आणि आप्तभाव चाचणी घेणे अनिवार्य आहे. तथापि, आम्ही हे स्पष्ट करतो की ह्या न्यायनिर्णयात आम्ही नोंदविलेल्या कारणांमुळे आक्षेपित न्यायनिर्णयामध्ये नोंदविण्यात आलेले निरीक्षणास आम्ही पाठिंबा देत नाही की "आप्तभाव चाचणी ही दाव्याचा अचूकपणा निर्धारित करण्याचा अविभाज्य भाग आहे"

**<u>निष्कर्ष</u>**

३६. अशा प्रकारे, निष्कर्ष काढण्यासाठी, आम्ही असा निर्णय देतो की :

**(ए)** चौकशी केल्यानंतर पडताळणी समिती अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्याविषयी

समाधानी नसेल, तेव्हाच प्रकरण दक्षता पथकाकडे पाठविता येऊ शकते. दक्षता पथकाकडे प्रकरण पाठवितांना, पडताळणी समितीने, अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्यांविषयी ती समाधानी नसल्याच्या निष्कर्षावर येण्याची संक्षिप्त कारणे नोंदविली पाहिजे. प्रकरणे चौकशी करण्यासाठी दक्षता पथकाकडे पाठविल्यानंतरच, आप्तभाव चाचणी करण्यासाठी निमित्त उद्भवेल.

**(बी)** आम्ही नोंदविलेल्या कारणांमुळे, आप्तभाव चाचणी ही दोहोंपैकी एका प्रकारे निर्णायक असू शकत नाही. जेव्हा दक्षता पथकाद्वारे आप्तभाव चाचणी घेतली जाते, तेव्हा पडताळणी समितीला, जातीच्या वैधतेच्या दाव्यावर निर्णय देण्यासाठी चाचणीचा निकाल आणि पुरावा मूल्य असलेले अभिलेखावरील इतर सर्व पुरावे विचारात घ्यावे लागेल; आणि

**(सी )** थोडक्यात, आप्तभाव चाचणी ही जातीच्या दाव्यावर निर्णय देण्यासाठी रासायनिक चाचणी (लिटमस चाचणी) नाही आणि प्रत्येक प्रकरणात जातिच्या किंवा जमातीच्या दाव्याचा अचूकपणा निर्धारित करण्याच्या प्रक्रियेतील तो अत्यावश्यक भाग नाही.

३७. आम्ही, प्रबंधक कार्यालयास निर्देश देतो की त्यांनी आमच्याद्वारे उत्तर दिलेले निर्देश विचारात घेऊन अपीले/विशेष अनुमती याचिकावर निर्णय घेण्यासाठी ती अपीले/विशेष अनुमती याचिका समुचित न्यायपीठासमोर ठेवावी.

निर्देशाला उत्तर दिले.

**<u>तळटीप :-</u>**

[१](१९९४) ६ एससीसी २४१

[२] २००९ (३) एमएचएलजे (एफबी) ९९५

[३](२०१०) १४ एससीसी ४८९

[४] (२०१२) १ एससीसी ११३

[५]२०१० (६) एमएचएलजे ४०१

[६](२०१६) १० एससीसी १६६

[७](१९९४) १ एससीसी ३५९

[८](२००७) १ एससीसी ८०

[९](२०१२) १ एससीसी ३३३

[१०](२०२१) ९ एससीसी ८११

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".